
# हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या

## समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे




**संगीता रेगे**



सहत

सेंटर फॉर इन्क्वायरी इन टू
हेल्थ अँड अलाईड थीम्स

दिलासा

**हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे**

२००८ मध्ये प्रकाशित
सुधारीत व पुनर्मुद्रित आवृत्ती २०१६
मराठी भाषांतरीत आवृत्ती २०१७

द्वारा
**सेंटर फॉर इन्क्वायरी इन टू हेल्थ अँड अलाईड थीम्स**
सर्वे नं.२८०४ व २८०५, आराम सोसायटी रोड,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.
दूरध्वनी क्र.: २६६७३५७१ / २६६७३१५३
फॅक्स : २६६७३१५६
ईमेल : cehat@vsnl.com
संकेतस्थळ : www.cehat.org

**दिलासा**
विभाग क्र.१०१, गायनिऍक ओपीडी,
के. बी. भाभा हॉस्पिटल, बांद्रा (पश्चिम),
मुंबई-४०० ०५०.
दूरध्वनी क्र.: २६४००२२९ (थेट)
२६४२२७७५, २६४२२५४१ विस्तारित क्र. ४३७६
ईमेल : dilaasa@vsnl.com

(सार्वजनिक आरोग्य खात्याचा संयुक्त प्रकल्प - के.बी. भाभा हॉस्पिटल, बांद्रा (प.) व
सेंटर फॉर इन्क्वायरी इन टू हेल्थ अँड अलाईड थीम्स (सेहत)

© सेहत

**ISBN : 978-81-89042-74-5**

मराठी अनुवाद : अश्विनी जोग

आराखडा व मांडणी : वर्डक्राफ्ट

मुद्रण : साटम उद्योग
परेल, मुंबई-४०० ०१२.

# अंतरंग


**आभार .... ०४**

**प्रस्तावना .... ०५**

**पार्श्वभूमी .... ०७**

**१. मूल्ये .... ०९**

अ. आत्मभान
आ. गोपनीयता
इ. एकमेवता
ई. स्व-निश्चय
उ. विविधतेची दखल
ऊ. लिंगभेदात्मक विचारसरणीस आव्हान देण्याविषयी बांधिलकी
ऋ. सत्तासंबंध ओळखणे
ल. जबाबदारी

**२. स्त्रीवादी समुपदेशनाची मूल्यतत्वे .... १३**

अ. व्यक्तिगत तेच राजकीय
आ. रोग नव्हे संकट
इ. जाणीव जागृती
ई. अनिर्णायकतेचे मूल्य
उ. हिंसेशी तडजोड नाही

**३. स्त्रीवादी समुपदेशनाची तंत्रे .... १५**

अ. कारणीभूत घटक ओळखणे
आ. निभाव यंत्रणांचा शोध
इ. वैयक्तिक दडपशाहीचा लिंगभावाशी संबंध
ई. डळमळीतपणा हाताळणे
उ. लैंगिक अत्याचारांचा शोध
ऊ. हिंसेशी सामना
ऋ. महिलांची सामाजिक ओळख प्रस्थापित होण्याच्या प्रक्रियेचे अवलोकन

**४. समुपदेशनाचे घटक .... २१**

अ. संवादी नाते प्रस्थापित करणे
आ. सुरक्षा चाचणी व नियोजन
इ. आत्महत्या
ई. निवाऱ्याचा पर्याय
उ. अहिंसेकरिता वाटाघाटी
ऊ. पोलिसांची मदत घेण्याकरिता महिलांची तयारी
ऋ. अन्यत्र पाठवणूक करण्याची गरज

**५. विशिष्ट परिस्थितीमध्ये समुपदेशिकेची भूमिका .... ३१**

अ. बलात्कार
आ. जळणे
इ. मानसिक आजार

**६. समुपदेशनातील आव्हाने .... ३५**

**७. समुपदेशन केंद्र चालविण्याचे आचार नियम .... ३७**

**निष्कर्ष .... ४०**

**संदर्भ .... ४१**

**जोडपत्रे .... ४२**

जोडपत्र १ : प्रकरणांचा गोषवारा
जोडपत्र २ : महिलांवरील हिंसेशी भारतातील कायदे
जोडपत्र ३ : भारतातील महिलांसोबत काम करणाऱ्या संस्था

# आभार

प्रथम आराखड्याचे परीक्षण करुन मला ही मार्गदर्शक तत्वे निर्माण करण्यास मदत करणाऱ्या सर्व व्यक्तींची मी आभारी आहे. अनुजा गुप्ता, अपर्णा जोशी, नंदिनी राव, राधिका चंदिरामानी, प्रभा नागराज व नूरजहान साफिया नियाझ यांनी प्रथम आराखड्याचे परीक्षण केल्याबद्दल त्यांचे आभार.

'सेहत'च्या कार्यक्रम विकास समितीचे देखील मी या ठिकाणी आभार मानते. तेजल जेटली यांनी भाषा संपादनात महत्त्वाची मदत केल्याबद्दल त्यांची मी ऋणी आहे. या पुस्तिकेची संकल्पना उभी करण्यात माझी मदत करणाऱ्या पद्मा देवस्थळी व अरुणा बुरटे यांचा उल्लेख न केल्यास हे आभार प्रदर्शन अपूर्ण ठरेल.

मुख्य वैद्यकीय अधीक्षिका व 'दिलासा'च्या प्रकल्प संचालिका डॉ. सीमा मलिक व 'दिलासा' व 'पेहेल' प्रकल्पाच्या संपूर्ण चमूचे विशेष आभार. आणि अखेरीस तितक्याच महत्त्वाच्या असलेल्या, दिलासा समुपदेशन केंद्राकडे वळलेल्या व दडपशाहीचे वैयक्तिक अनुभव कथन केलेल्या सर्व महिलांचे मी आभार मानते.

# प्रस्तावना

हिंसा हा एक आरोग्यविषयक व मानवी हक्क विषयक प्रश्न आहे याविषयी जाणीव जागृती करण्याकरिता, तसेच हिंसाग्रस्त व्यक्तींना प्रतिसाद देण्यात आरोग्य व्यावसायिकांनी व आरोग्य व्यवस्थांनी महत्वाची भूमिका बजावली पाहिजे याकरिता समर्थनात्मक काम सेहत करीत आहे. या कामाची सुरुवात लैंगिक हल्ल्याच्या बाबींच्या तपासणीमध्ये सहभागी होण्यापासून व तद्नंतर शिक्षण, नोंदणी कार्य व संशोधन करण्यामधून झाली. एककेंद्रीय संकट निवारण (OSCC) या संकल्पनेमुळे आरोग्य व्यवस्थेसोबत थेट काम करण्याची व महिलाविरोधी हिंसेस प्रतिसाद देण्यात सार्वजनिक आरोग्य सेवा कोणती भूमिका बजावू शकतात याचे प्रात्यक्षिक दाखविण्याची उत्तम संधी प्राप्त झाली. सेहत व बृहन्मुंबई महानगरपालिकेचा संयुक्त प्रकल्प असलेले दिलासा, हे एक सार्वजनिक रुग्णालय स्थित संकट निवारण केंद्र असून बांद्रा पश्चिम येथील के.बी. भाभा रुग्णालयात स्थापिलेले आहे. महानगरपालिकेने याच प्रकल्पाची पुनरावृत्ती मुंबईतील पूर्वेकडील उपनगरातील एका रुग्णालयातही केली आहे. संशोधन, प्रशिक्षण व सेवा हे या प्रकल्पाचे महत्त्वाचे घटक आहेत. हे सार्वजनिक रुग्णालय स्थित संकट निवारण विभाग, हिंसेचा सामना करणाऱ्या महिला व मुलींना समुपदेशन सेवा पुरवितात. दिलासामध्ये स्त्रीवादी समुपदेशन पद्धत वापरली जाते. स्त्रीवादी समुपदेशन पद्धतीमध्ये नातेसंबंधांमधील असमानता व सत्ता यांना आव्हान दिले जाते व त्यामुळे अत्याचारी नात्यांमध्ये जगणाऱ्या महिलांकरिता ही पद्धत अत्यंत प्रभावी मानली जाते. बाह्य जगातील दडपशाहीच्या संरचनांमधून उद्‌भवणाऱ्या असमानतेच्या संदर्भ चौकटीमध्ये स्वतःचे अनुभव समजून घेण्यास महिलांना ही पद्धत सहाय्यभूत ठरते. केवळ अंतस्थ मनोव्यापारांवर भर देणाऱ्या व समस्यांमागील भेद्‌भावात्मक सामाजिक संरचना/नातेसंबंध नजरेआड करणाऱ्या प्रस्थापित/पारंपारिक समुपदेशन पद्धतीपेक्षा ही पद्धत विभिन्न ठरते. तरीही, समुपदेशनाची शाखा म्हणून स्त्रीवादी समुपदेशनावर भारतामध्ये अत्यल्प नोंदी व साहित्य उपलब्ध आहे. यामुळेच, कौटुंबिक हिंसेकरिता भारतातील स्त्रीवादी समुपदेशन पद्धतीच्या वापराविषयी व त्या अनुषंगाने आमच्या अनुभवांविषयी नोंदी करण्यास आम्ही उद्युक्त झालो.

ही संकट निवारण केंद्रे सार्वजनिक रुग्णालयांमध्ये स्थापन केल्यामुळे हिंसाग्रस्त व्यक्तींकरिता संकट निवारण सेवांची उपलब्धी वाढते हे यामधून स्पष्टपणे सिद्ध झाले आहे. महिलांवरील हिंसा हा आरोग्य क्षेत्रातील एक आणीबाणीचा प्रश्न आहे याची सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेकडून दखल घेतली जाईल व आपल्या कर्मचाऱ्यांना त्याविषयी संवेदनशील बनवून हिंसाग्रस्त व्यक्तींकरीता अशा सेवा स्थापन करण्यात येतील अशी आम्ही आशा करतो. हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांचे समुपदेशन करण्याकरिता असलेली ही मार्गदर्शक तत्वे संगीताने दिलासा चमू व तज्ज्ञांशी चर्चा करुन कसोशीने तयार केली आहे. जरी ही मार्गदर्शक तत्वे महिलांवरील हिंसेची रुग्णालयामध्ये हाताळणी करणाऱ्या व्यक्तींचा दृष्टीकोन व कौशल्य बांधणी करण्याकरिता निर्माण केली गेली असली तरीही इतरांकरिता देखील ती तेवढीच उपयुक्त ठरतील. यामध्ये या प्रश्नांवरील योग्य दृष्टीकोन तसेच प्रत्यक्ष आयुष्यातील उदाहरणे दिलेली आहेत. भारतातील स्त्रीवादी समुपदेशनावरील विवेचनामध्ये योगदान देण्याच्या आमच्या अनेक प्रयत्नांपैकी हा एक प्रयत्न आहे.

**पद्मा देवस्थळी**
समन्वयक, सेहत

# पार्श्वभूमी

## हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

दिलासा हा हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांना सामाजिक व मानसिक सहाय्य देणारा एक रुग्णालय स्थित विभाग आहे. सार्वजनिक आरोग्य खात्याचे के.बी. भाभा हॉस्पिटल, बांद्रा (प.) व सेंटर फॉर इन्क्वायरी इन टू हेल्थ अँड अलाईड थीम्स (सेहत) यांचा हा संयुक्त प्रकल्प आहे. त्यानुसार, प्रकल्प चमूमध्ये रुग्णालयातील तसेच सेहत मधील व्यावसायिकांचा समावेश होता (यातील बहुतेक सर्वजण समाजसेवा किंवा मानसशास्त्रातील पदवीधारक होते). हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांना समुपदेशन करण्याचे काम हा चमू करणार होता.

महिलांसोबत थेट काम सुरु करण्यापूर्वी आपल्या देशात हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांना समुपदेशन करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या पद्धतींशी आम्हाला ओळख करुन घ्यावयाची होती. परंतु याविषयी कोणतेही साहित्य आम्हाला सापडले नाही. कौटुंबिक हिंसेच्या समुपदेशनाशी संबंधित अन्य देशांतील साहित्य व माहिती आमच्या संदर्भ चौकटीत बसत नव्हती. सुरुवातीला आम्हाला महिलांवर सर्वसाधारणपणे होणारी हिंसा व विशेषतः कौटुंबिक हिंसेचा प्रश्न समजून घेण्यास प्रयत्न करावे लागले. स्त्री चळवळीतील काही अनुभवी व्यक्तींनी स्त्रीवाद व स्त्रीवादी समुपदेशनासंबंधीची आमची समज वाढविण्यास मदत केली. रुग्णालय परिसराला व हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांनाही अनुरुप ठरेल अशा प्रकारची समुपदेश पद्धती निर्माण करण्यास आम्हाला जवळपास एक वर्ष लागले.

रुग्णालयातील कर्मचारीच समुपदेशन सेवा पुरवू शकतात हे सिद्ध करण्याकरिता दिलासाच्या प्रयोगाची निर्मिती करण्यात आली होती. प्रकल्पाच्या मुदतीच्या शेवटी सेवा पुरविण्यातील सेहतचा सहभाग संपणार व रुग्णालय कर्मचारीच प्रकल्पाचे पूर्ण कामकाज चालविणार हे स्पष्ट होते. परंतु ते प्रत्यक्षात आणणे तेवढे सोपे नव्हते. रुग्णालयात ही सेवा देणारे कर्मचारी म्हणजेच परिचारिका असाव्यात असे आमचे मत होते कारण त्या रुग्णांसोबत बराच काळ घालवतात व रुग्णांची काळजी घेण्यात त्यांचा मोठा वाटा असतो. या प्रक्रियेत आम्हाला अनेक अडचणी आल्या, मुख्यतः परिचारिकांच्या नियुक्तीसंबंधी; नियुक्त केल्या गेल्या तरीही अन्य परिचारिकांच्या गैरहजेरीत किंवा एकंदर कर्मचाऱ्यांच्या तुटवड्यामुळे त्यांना वारंवार रुग्णालयाच्या अन्य कामामध्ये गुंतविले जाई.

परंतु सुरुवातीच्या या अडथळ्यानंतर आम्हाला समुपदेशनाच्या कामात स्वारस्य असलेले कर्मचारी मिळू शकले. या समुपदेशिकांचे प्रशिक्षण करीत असताना आमच्या असे लक्षात आले की महिलांच्या समुपदेशनाच्या आमच्या अनुभवावर आधारित मार्गदर्शक तत्वे निर्माण केल्यास, त्याआधारे कौटुंबिक हिंसेचा सामना करीत असलेल्या महिलांचे प्रत्यक्ष समुपदेशन करण्याकरिता आवश्यक ती रणनीती नक्की आखता येईल.

म्हणूनच या मार्गदर्शक तत्वांचा उद्देश असा आहे की महिलांवरील हिंसेच्या प्रश्नाविषयी सखोल समज असलेल्या व्यावसायिकांना समुपदेशनाची कौशल्ये बहाल करणे. आमचा अनुभव प्रामुख्याने कौटुंबिक हिंसेच्या क्षेत्रातील आहे. परंतु आम्ही सार्वजनिक रुग्णालयामध्ये काम करीत असल्याने बलात्कार, जाळणे व लैंगिक हिंसेचे बळी ठरलेल्या महिला व मुलांशी देखील आमचा संबंध आला. त्यामुळे आमच्या असे लक्षात आले की या सर्व प्रकारच्या हिंसाग्रस्त महिलांकरिता देखील समुपदेशिकांनी प्राथमिक सहाय्य पुरविणे गरजेचे आहे. शिवाय या मार्गदर्शक तत्वांची नाळ स्त्रीवादी विचारसरणीशी जोडलेली आहे - *समुपदेशनातून महिलांना हे समजले पाहिजे की हिंसेचे कारण त्यांच्या बाह्य परिस्थितीत असते व हिंसेची मुळे पुरुषप्रधानतेमध्ये रुजलेली असतात.*

* *अधिक स्पष्टतेकरिता या पुस्तिकेत काही खऱ्या बाबी (त्यातील नावे बदलून) देण्यात आल्या आहेत.*

# मूल्ये

हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

मूल्ये ही एकंदर समुपदेशनाचा व विशेषतः स्त्रीवादी समुपदेशनाचा एक महत्वाचा संदर्भ बिंदू असतात. याचे कारण असे की स्त्रीवादी समुपदेशन, प्रत्येक समुपदेशनार्थी बरोबर समुपदेशिकेस तिची स्वतःची वैयक्तिक व व्यावसायिक मूल्ये पुन्हा पुन्हा तपासून पाहण्यास उद्युक्त करते. शिवाय, समुपदेशनाच्या दरम्यान महिला जेव्हा त्यांच्यावरील दडपशाहीचे व हिंसेचे अनुभव कथन करतात तेव्हा त्या नकळत त्यांची स्वतःची मूल्ये देखील उघड करीत असतात.

महिलांना करीत असलेल्या समुपदेशनाचा एक भाग म्हणून समुपदेशिकांना अनेकदा या मूल्यांची स्पष्टता मागावी लागते किंवा त्यांना आव्हान द्यावे लागते. परंतु त्यापूर्वी समुपदेशिकांनी हे समजून घेतले पाहिजे की महिलांची मूल्ये ही त्यांच्या सभोवतालच्या वातावरणात व समाजात वरचढ किंवा सर्वमान्य ठरलेल्या विचारांवरच बेतलेली असतात. येणाऱ्या महिलेची सांस्कृतिक संदर्भ चौकट, तिने अनुभवलेल्या हिंसेचा इतिहास व पुरुषी वर्चस्व असलेल्या समाजात स्त्री म्हणून वावरतानाचे तिचे अनुभव हे देखील त्यांनी समजून घेतले पाहिजेत. अनेकदा महिलांची स्वतःची आत्मसन्मानाची कल्पना ही इतरांना त्यांच्याबद्दल काय वाटते व त्यांच्या भूमिकांकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षांवर अवलंबून असते. जेव्हा महिला स्वतःचा आत्मसन्मान वाढविणाऱ्या भूमिका निर्माण करते, तेंव्हाच तिला शून्य लेखणाऱ्या प्रचलित सामाजिक मूल्यांशीदेखील तिला लढा द्यावा लागत असतो.

स्त्रीवादी समुपदेशनाची मूल्ये समुपदेशिकेस समाजात महिलांवर होणाऱ्या सर्वसाधारण दडपशाहीच्या अनुषंगाने त्यांचे अनुभव समजून घेण्यास मदत करते. समुपदेशनाच्या दरम्यान दिले जाणारे हिंसेचे पुरावे समुपदेशिकेस तिची स्वतःची मूल्ये देखील तपासून पाहण्यास उद्युक्त करतात.

स्त्रीवादी समुपदेशनाच्या मूल्यांमध्ये खालील मुद्दे समाविष्ट असतातः

अ. **आत्मभान**

या मूल्यात असे अभिप्रेत आहे की समुपदेशिकेस स्वतःच्या बलस्थानांची तसेच मर्यादांची जाणीव असावी. समुपदेशिकेने आत्मपरीक्षण करणे व जबाबदार असणे यात अभिप्रेत आहे. समुपदेशिकेस जर स्वतःच्या विचारांची जाणीव नसेल, किंवा ते विचार आपले स्वतःचे आहेत हे मान्य करण्याची तयारी नसेल तर ते विचार तिच्याकडून समुपदेशनार्थी पर्यंतही पोहोचविले जातील. यामुळे समुपदेशन या मूळ संज्ञेचाच पराभव होईल. उदा. एखाद्या समुपदेशिकेस असे वाटत असेल की जेंव्हा एखाद्या महिलेस तिच्या नात्यामध्ये तीव्र हिंसा सहन करावी लागते तेंव्हा त्या नात्यातून बाहेर पडणे हाच पर्याय तिच्याकरिता सर्वोत्तम ठरु शकतो. जेंव्हा त्या महिलेकरिता सर्वात चांगले काय ठरेल याचा विचार समुपदेशिकेने आधीच करुन ठेवला असतो तेव्हा त्या महिलेसोबत इतर पर्यायांचा शोध घेणे अशक्यच होऊन बसते. मात्र, जर समुपदेशिकेस तिच्या स्वतःच्या विचारांची जाणीव असेल तर आपल्या विचारांचा प्रभाव ती समुपदेशनार्थी महिलेच्या निर्णयावर पडू देत नाही.

आ. **गोपनीयता**

समुपदेशनाच्या नात्यातील हे एक मूलभूत तत्व आहे. अत्याचारी नातेसंबंधांविषयी बोलणे सोपे नसते. गोपनीयता राखण्याचे वचन समुपदेशनार्थी महिलेचा विश्वास प्राप्त करुन घेऊ शकते. काही प्रसंगांमध्ये हे मूल्य जपणे कठीण होते. विशेषतः समुपदेशिकेच्या मते ज्या महिलेने आत्माघाताकडे कल दर्शविला आहे अशा प्रसंगात हे मूल्य जपणे विशेष कठीण जाते. अशा वेळी कुटुंबातील एखाद्या व्यक्तीस किंवा जवळच्या मैत्रिणीस, किंवा समुपदेशनार्थी महिलेचा विश्वास असलेल्या एखाद्या व्यक्तीस, त्याची कल्पना द्यावी लागते. यावकरिता महिलेला देखील विश्वासात घ्यावे लागते.

### इ. एकमेवता

अनेकदा निरनिराळ्या महिलांच्या दडपशाहीच्या व हिसेंच्या अनुभवांमध्ये साम्य आढळते. परंतु अत्याचारांचा प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा असून, जरी वरवर साम्य आढळले तरीही, प्रत्येक महिलेचा लढा निराळा असतो. कालांतराने, समुपदेशिकेस प्रत्येक बाबीतील एकमेवता लक्षात घेणे कठीण होते. यामुळे सामान्यीकरण करण्याचा धोका उद्‌भवतो. यामुळे महिलेच्या अनुभवांचा शोध घेणे व त्यात समरस होणे याकरिता वाव राहत नाही. म्हणूनच, प्रत्येक समुपदेशनार्थीच्या एकमेवतेचा आदर करणे महत्त्वाचे असते.

### ई. स्व-निश्चय

स्वतःच्या परिस्थितीवर तोडगा काढण्याची महिलेची क्षमता समुपदेशिकेने ओळखली, मान्य केली व विकसित केली पाहिजे. हिंसाग्रस्त महिलेकडे, दुर्दैवाच्या फेऱ्यांची बळी ठरलेली गरीब गाय अशा दृष्टीकोनातून पहिले जाऊ नये. पुढील रणनीती ठरवण्यात तिचा स्वतःचा सहभाग असल्यास, तिचा आत्मविश्वास वाढून तिला परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचे बळ मिळू शकेल.

केस स्टडी : तीव्र हिंसेचा सामना करीत असलेल्या एका महिलेने सांगितले की, तिचा नवरा तिच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याच्या धमक्या देतो आहे, परंतु तरीही तिला घर सोडायचे नाही. वरील मूल्य समुपदेशानामध्ये अमलात आणायचे झाल्यास, अशी रणनीती आखावी लागेल ज्यामुळे महिला व तिची मुले सुरक्षित राहतील व तिच्यावर व मुलांवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये वाढ होणार नाही. पुढील रणनीती ठरवण्यात तिचा स्वतःचा सहभाग असल्यास, तिचा आत्मविश्वास वाढून तिला परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याचे बळ मिळू शकेल.

### उ. विविधतेची दखल

या मुल्यामध्ये समुपदेशिकांना महिलांच्या विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व लैंगिक ओळखी व पार्श्वभूमींची दखल घेण्यास सांगितले आहे. विशिष्ट पार्श्वभूमी व ओळखीमुळे कोणत्या प्रकारचे अडथळे येऊ शकतात याची जाणीव महिलांना समुपदेशनातून करुन देण्यात येते. ओळखी व पार्श्वभूमीतील या विविधतेमुळे महिला विभागल्याही जातात. हे मुल्य स्त्रीवादी समुपदेशानाचा पाया आहे कारण महिलांना जाणवणारी विषमता व हिंसा ही त्यांच्या पार्श्वभूमीवर अवलंबून आहे असा एक विचार आहे.

### ऊ. लिंगभेदात्मक विचारसणीस आव्हान देण्याविषयी बांधिलकी

समुपदेशिकांनी स्वतः मधील लिंगभेदात्मक मुल्यांचा शोध घेऊन त्यावर सहयोगींशी चर्चा करावी ज्यायोगे त्या शक्य तितक्या पारदर्शकतेने व सच्चेपणाने स्त्रीवादी विचारसरणी अंगिकारु शकतील, असे या मुल्यांमध्ये अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे समुपदेशनास येणाऱ्या महिलांच्या लिंगभेदात्मक मुल्यांवर चर्चा होणेदेखील यामध्ये अभिप्रेत आहे. उदा. समुपदेशनार्थीने असे म्हटले की तिच्या नवऱ्याचे एका विधवा स्त्रीशी विवाहबाह्य संबंध आहेत, व विधवा स्त्रियांचे चारित्र्य कधीच चांगले नसते. समुपदेशिकेने तिचे म्हणणे सहानुभूतीने ऐकून घेतले पाहिजे परंतु त्याचबरोबर तिचा विधवा स्त्रियांविषयी असलेला सरसकट गैरसमज दूर करण्याचाही प्रयत्न केला पाहिजे व विवाहबाह्य संबंधांची जबाबदारी तिच्या नवऱ्यावर आहे हे स्पष्ट केले पहिजे.

### ऋ. सत्तासंबंध ओळखणे

हे मूल्य समुपदेशिकेच्या भूमिकेशी निगडीत असलेली सत्ता अधोरेखित करते. ही सत्ता समुपदेशिकेच्या जात, वर्ग, धर्म,

शिक्षण यासारख्या घटकांमुळे असू शकते. अनेकदा समुपदेशिका व समुपदेशनार्थी यांच्या स्थानामध्ये तफावत असते. समुपदेशिकेने समुपदेशन करताना या तफावतीबद्दल व त्यामुळे तिला मिळणाऱ्या सत्तास्थानाबद्दल जागरुक असणे आवश्यक आहे. तसे केले नसल्यास, सामाजिक विषमतेमुळे समुपदेशनार्थीला जाणवणारे तोटे लक्षात न घेताच समुपदेशिकेकडून त्यावर पर्याय सुचविले जातील. या तफावतीमुळे समुपदेशनार्थीस धाकही वाटू शकेल ज्यामुळे समुपदेशनाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतील. उदा. उच्चवर्गीय व बहुसंख्यांक समाजातील समुपदेशिकेने अल्पसंख्यांक व मागासवर्गीय समुपदेशनार्थीस समुपदेशन करीत असताना तिला असणाऱ्या सामाजिक सत्तेविषयी जागरुक असले पाहिजे.

ल. **जबाबदारी**

या मुल्यामध्ये समुपदेशिकेस महिलाविरोधी हिंसेच्या प्रश्नामधील स्त्री चळवळीचे योगदान ध्यानात ठेवण्यास सांगितले आहे. समुपदेशनाच्या प्रक्रियेत बाह्य जगातील राजकीय चळवळी व सामाजिक संरचनांचे संदर्भ लक्षात घेण्याची जबाबदारी समुपदेशन करणाऱ्यांवर असते.

# स्त्रीवादी समुपदेशनाची मूल्यतत्वे

हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

अ. **व्यक्तिगत तेच राजकीय**

पुरुषप्रधानता व लिंगभावानुसार स्त्रीपुरुषांना बहाल केलेल्या भूमिका यांचा परमोच्च बिंदू म्हणजे महिलांवर होणारी हिंसा असे या मुल्यतत्वात सुचविले आहे. यामुळे समुपदेशक या प्रश्नाकडे केवळ वैयक्तिक किंवा व्यक्तिगत समस्या म्हणून पाहत नाही. आहे तीच स्थिती राखण्यात पुरुषांना मदत करण्याकरिता महिलांवरील हिंसा साधन म्हणून मोठ्या प्रमाणात वापरली जाते. उदा. हे तत्व कार्यान्वित करण्याकरिता महिलेला हे लक्षात आणून द्यावे लागेल की तिने चांगला स्वयंपाक केला नाही/ती घरी उशिरा आली/तिने मोठ्या माणसांचे ऐकले नाही, या कारणांसाठी तिला मारहाण झाली नसून, तिला मारहाण करणाऱ्या व्यक्तीकडे अधिक सत्ता आहे व कुटुंबातील प्रस्थापित नियमांना आव्हान दिले जाऊ नये म्हणून मारहाण करुन तिच्यावर नियंत्रण ठेवण्यात येत आहे.

आ. **रोग नव्हे संकट**

हिंसेमुळे शरीर व मनावर गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. महिला कसेतरी निभावून नेत असतात.दीर्घकाळापर्यंत हिंसक नात्यामध्ये राहणाऱ्या महिलांवर अनेक वेळा वेडसर किंवा चक्रम असे शिक्के मारले जातात व त्यांचे वागणे विकृत ठरविले जाते. या तत्वामध्ये, निभावून नेण्याकडे संकटाचा सामना करण्याचे तंत्र म्हणून पाहिले जाते. रोगाचा परिणाम म्हणून नव्हे. महिलांच्या नकारात्मक प्रतिमा निर्माण होण्यापासून रोखण्याकरिता अशा प्रकारे दखल घेणे गरजेचे ठरते. तीव्र हिंसा झालेल्या महिलांना मानसिक आजार होण्याचाही संभव असतो. अशा प्रसंगांमध्ये देखील समुपदेशिकेने महिलेला तिचा मानसिक आजार व तिच्यावर होणारी हिंसा यांचा परस्पर संबंध लक्षात आणून दिला पाहिजे.

इ. **जाणीव जागृती**

समुपदेशनाच्या नातेसंबंधामध्ये महिलेला हे लक्षात आणून देणे गरजेचे आहे की पुरुषप्रधान वातावरणामधील विवाह व कुटुंब यामध्ये काही आंतरिक विरोधाभास आहेत जे महिलांना मारक ठरतात. यामागील उद्देश असा की आपण सर्वांनीच सामाजिक बदल आणण्याकरिता काम करणे जरुरीचे आहे. या तत्वाचा वापर करुन समुपदेशनाच्या नातेसंबंधामध्ये असलेल्या महिलांची जाणीव जागृती करता येते.

ई. **अनिर्णायकतेचे मूल्य**

स्त्रीवादी समुपदेशन महिलांना स्वत:मधील व्यक्तिगत अनिर्णायकता तपासून पाहण्यास वाव देते. हे तत्व कार्यान्वित करण्याकरिता अशा संदिग्धतेमागील कारणे ओळखणे व त्यांची दखल घेणे गरजेचे आहे. परंतु यामुळे महिलांना हेदेखील लक्षात आणून दिले जाते की निकटच्या नातेसंबंधांचे स्वरुप देखील अशा अनिर्णयाकतेकरिता कारणीभूत असते. उदा. एखादी महिला घटस्फोटाचा विचार करीत असतानाच एखाद्या वेळी असेही म्हणते की तिला नातेसंबंध सुधारावे असेही वाटते. मनात होणाऱ्या चलबिचलीवर महिलेला विचार करायला सांगून दोन्ही पर्यायांमुळे होऊ शकणारे संभाव्य परिणाम समुपदेशिकेने तिच्या लक्षात आणून दिले पाहिजेत.

उ. **हिंसेशी तडजोड नाही**

हिंसेला तोंड देणाऱ्या महिलांना हिंसा करणाऱ्या व्यक्तीला कोणत्या तरी प्रकारे इजा पोहोचवून त्याच सूड घेण्याची इच्छा होऊ शकते. समुपदेशिका हे समजून घेऊन परंतु त्याला प्रोत्साहन न देता त्याची हाताळणी केली पाहिजे. अशा भावना हाताळण्याकरिता सूडाच्या संकल्पनेचा शोध घेणे गरजेचे ठरते.

# स्त्रीवादी समुपदेशनाची तंत्रे

हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

## हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

हिंसेचा सामना करीत जगणाऱ्या महिलांना समुपदेशन करणे गुंतागुंतीचे असते व याकरिता समुपदेशिकेने समुपदेशनाची उद्दिष्टे निश्चित करणे महत्वाचे ठरते. ही उद्दिष्टे समुपदेशनार्थीच्या अपेक्षांवर आधारित असतात. परंतु अनेकदा समुपदेशनाकडून आपण कोणत्या अपेक्षा ठेवू शकतो किंवा त्यातून आपल्याला काय साधायचे आहे याची जाणीव महिलेला देखील नसते. शिवाय, तिने जरी अपेक्षा मांडल्या असल्या तरी कालांतराने त्यात बदल होऊ शकतो. याचे कारण म्हणजे बहुतेक नात्यांमध्ये राग, भीती, निराशा, वैफल्य, प्रेम, तिरस्कार अशा मिश्र भावनांची गुंफण झालेली असते. अशा भावनांवर मात करणे सोपे नसते. अंतिम उद्दिष्ट हे महिलेला हिंसामुक्त जीवन जगण्याकरिता मदत करण्याचे असले पाहिजे.

समुपदेशिकेस हिंसेचा प्रश्न हाताळण्याकरिता आवश्यक तंत्रे, हिंसेच्या कारणांविषयी महिलेची जाणीव वाढविण्याच्या पद्धती, हिंसा हाताळण्याचे मार्ग व नात्यामधील तिचे अवकाश निर्माण करण्याच्या काही पद्धती खाली दिल्या आहेत.

### अ. **कारणीभूत घटक ओळखणे**

काही महिलांना आपल्या अपेक्षा स्पष्ट करता येत नाहीत व मुद्याला धरुन बोलता येत नाही. त्यांना समुपदेशिकेविषयी तितकीशी खात्री वाटत नाही व विशिष्ट विषयांवर बोलण्यास त्या कचरतात. समुपदेशिकांनी हे समजून घेतले पाहिजे की काही वेळा महिला स्पष्टपणे प्रश्न मांडत नाहीत कारण त्यांना आपल्यावर कोणी विश्वास ठेवेल याची खात्री नसते. समाज महिलांच्या वागण्याकडे ज्या पद्धतीने पाहतो व महिलांवर ज्या प्रकारे शिक्के मारले जातात, त्यामुळे ही भीती उत्पन्न होते. समाजाने ज्या प्रकारचे वर्तन “गैर” ठरविले असते. त्याविषयी बोलले तर आपल्याला त्याचे परिणाम भोगावे लागतील अशीही भीती महिलांना वाटत असते. असे होते कारण महिलांच्या शब्दावर बहुतेक वेळा विश्वास ठेवला जात नाही. याशिवाय, जर एखादी महिला घालून दिलेल्या नियमांपेक्षा निराळी वागत असेल तरीही बहुतेक वेळा तिला वाईटच वागविले जाते. त्याबद्दल समुपदेशिकेशी बोलल्यास तिच्याकडून मिळणारे सहाय्य देखील बंद होईल अशी भीती महिलेला वाटते.

अशा विषयांवर महिलांशी कसे बोलावे याचे एक उदाहरण खाली दिलेले आहे :

> कमरुन्नीसा ही २५ वर्षे वयाची विधवा स्त्री आहे. तिच्या सासरच्या माणसांनी तिच्या नवऱ्याच्या निधनानंतर तिला घर सोडून जाण्यास सांगितले आहे व त्यामुळे तिला स्वत:चे पोट भरणे कठीण जात आहे. त्याच्या भविष्य निर्वाह निधीच्या पैशातील काही भाग तिला देण्याचेही त्यांनी नाकारले आहे. तिने समुपदेशिकेकडे सासरच्या कुटुंबाकडून होणाऱ्या छळाविषयी सहाय्य मागितले आहे. समुपदेशनाच्या एका टप्प्यावर ती गोंधळलेली वाटत होती. तिच्या मनात काहीतरी खळबळ चालली आहे परंतु ती ते बोलू शकत नाही आहे असे समुपदेशिकेस वाटत होते. तिच्या मनात काय चालले आहे हे जाणून घेण्याचा समुपदेशिकेने अनेकदा प्रयत्न केला.
>
> अशा प्रसंगांमध्ये आपल्या समाजात विधवा स्त्रियांच्या सामाजिक स्थानाविषयी प्रचलित असलेले नियम व रुढी याविषयीची जाण असणे समुपदेशकांकरिता महत्वाचे ठरते अशा महिलांच्या लैंगिक गरजा व भावनांची कोणतीही दखल घेतली जात नाही.

### आ. **निभाव यंत्रणांचा शोध**

हिंसक परिस्थितीमध्ये राहणारी प्रत्येक महिला आपली परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न करीत असते. समुपदेशनाच्या प्रक्रियेत या प्रयत्नांचा शोध घेतला गेला पाहिजे. ज्यायोगे त्या महिलेमधील क्षमतांची कल्पना येऊ शकते. हे महत्वाचे ठरते कारण हा काटकपणाच तिला हिंसेविरुद्ध उभे राहण्यास मदत करतो.

म्हणूनच समुपदेशिकेने महिलेचे कथन लक्षपूर्वक ऐकून घेणे अत्यंत महत्वाचे असते. त्या कथनामधूनच महिलेने आतापर्यंत हिंसेचा सामना कशा प्रकारे केला आहे याची कल्पना समुपदेशिकेस येऊ शकते.

मारिया ही एकटी राहणारी स्त्री असून तिच्या आईवडिलांचे घर रिकामे करण्याकरिता तिच्या भावाकडून तिला सतत धमक्या मिळत असतात. प्रत्येक वेळेस तिचे सामान बाहेर फेकून दिले जात असे व आजूबाजूच्या लोकांसमोर तिला मारहाण केली जात असे यामुळे तिला सहन कराव्या लागणाऱ्या तीव्र अपमानाबद्दल ती नेहमी बोलत असे. ती हे गेली ६ वर्षे सहन करीत आली आहे. अधिक शोधक प्रश्न विचारल्यानंतर स्वत:ला निराश्रित होण्यापासून वाचविण्याकरिता मारिया वापरत असलेल्या पद्धतींची कल्पना समुपदेशिकेस आली. जवळच्या एका महिलेशी तिची मैत्री होती जिच्याकडे ती दिवसा आपले सामान ठेवत असे. ती घरकाम करत असलेल्या मालकीणीशी तिचे संबंध चांगले होते. तिच्या मालकिणीने तिला रात्रीच्या वेळात एका वृद्ध महिलेची काळजी घेण्याचे काम सुचविले. अशा पद्धतीने तिच्या निवाऱ्याचीही सोय झाली. समुपदेशिकेच्या मदतीने मारिया परिस्थितीशी सामना करण्याच्या स्वत:च्या क्षमतांविषयी अधिक जागरुक झाली.

सतत होणाऱ्या हिंसेचा महिलेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. समुपदेशिकेला महिला हिंसेचा सामना करण्याकरता वापरत असलेल्या पद्धती काम करत नसतील/अपयशी ठरत असतील तर ते ही ओळखता येणे आवश्यक आहे.

वीस वर्षाहून अधिक काळ हिंसेचा सामना करीत असलेल्या श्यामाच्या बाबतीत हे दिसून आले. तिचा नवरा हिंसक असूनही तिने नोकरी केली व स्वत:च्या मुलाला व नवऱ्याला देखील पोसले. परंतु सततच्या हिंसेमुळे ती स्वत:ने साध्य केलेल्या व एकहाती मिळविलेल्या यशाकडे सुद्धा योग्य पद्धतीने पाहू शकत नाही. सध्या तिच्या नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध तिच्या सहनशक्ती पलीकडे गेले आहेत. अलिकडे तिला दारु पिण्याची सवय लागली असून केवळ दारुमुळेच ती या सर्वाला तोंड देऊ शकते असे तिला वाटते. तिची शक्ती पुन:प्रस्थापित करुन परिस्थितीशी सामना करण्यास समुपदेशिकेस तिला तयार केले पाहिजे. त्याचबरोबर तिला दारुपासून दूर ठेवण्याकरिता सकारात्मक पर्यायांचा शोध देखील समुपदेशिकेने घ्यायला हवा.

### इ. वैयक्तिक दडपशाहीचा लिंगभावाशी संबंध

अनेकदा महिलांनाच त्यांच्यावर होणाऱ्या हिंसेकरिता जबाबदार ठरवले जाते. मुलगी, बहिण, पत्नी, सून, आई या तिच्या भूमिका ती कशी बजावते आहे याचे सतत परीक्षण होत असते व त्यावर टीकाही केली जात असते. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत महिलांमध्ये या अपेक्षा रुजविल्या जातात. समाजाला अपेक्षित असणाऱ्या या भूमिकांचे अवलोकन करण्यास महिलांना प्रोत्साहित करणे यात स्त्रीवादी समुपदेशनाचे मूल्य सामावले आहे. हिंसा ही एखाद्या स्वत:वरील नियंत्रण सुटणे अशी केवळ वैयक्तिक स्वरुपाची कृती नसून, समाजाने घालून दिलेल्या भूमिका महिलांना बळजबरीने मान्य करायला लावण्याची ती एक पद्धत आहे, हे स्पष्ट करणे हा समुपदेशनाचा उद्देश असायला हवा. तिच्यावर होत असलेली हिंसक कृती ही समाजाने रुढ केलेल्या लिंगभावात्मक भूमिकांशी कशी निगडीत आहे हे समुपदेशिका महिलेच्या आयुष्यातील उदाहरणे घेऊन देखील उलगडून दाखवू शकते.

२५ वर्षीय रझीयाला स्वयंपाक न केल्याबद्दल तिच्या भावाने अमानुषपणे मारले, कारण त्याला उपाशी पोटी कामावर जावे लागले. रझीयाने जेव्हा स्वत:लाच दोषी ठरविते तेव्हा समुपदेशिकेने तिला हे प्रश्न विचारण्यास मदत केली पाहिजे की घरामध्ये स्वयंपाक करण्याची जबाबदारी तिची एकटीचीच का असावी, व स्वयंपाक न केल्यामुळे मारणे हे योग्य आहे काय. केवळ तिने स्वयंपाक केला नाही म्हणून तिचा भाऊ तिच्यावर किती सत्ता चालवू शकतो हे ओळखण्यास समुपदेशिकेने रझीयाला मदत केली पाहिजे. यामुळे महिलांना समाजाने बहाल केलेल्या लिंगभावात्मक भूमिका त्यांच्यावर कसे नियंत्रण ठेवतात हे देखील रझीयाच्या लक्षात येऊ शकेल. याचबरोबर ती आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहे काय ह्याचा शोध ही समुपदेशिकेने घ्यायला हवा कारण आर्थिक परावलंबीत्वामुळे देखील दडपशाही होण्याची शक्यता वाढते.

### ई. डळमळीतपणा हाताळणे

नातेसंबंधांचा प्रश्न हा अतिशय गुंतागुंतीचा असल्याने हिंसक नातेसंबंधामध्ये कोणताही बदल करण्याच्या किंवा ते संपुष्टात आणण्याचा निर्णय घेणे हिंसाग्रस्त महिलांना अत्यंत कठीण जाते. हिंसक नातेसंबंध संपविण्याचा निर्णय घेतलेल्या महिला पुन्हा त्याच नातेसंबंधामध्ये राहण्याचे ठरवितात असा अनुभव समुपदेशिकांना अनेकदा येतो. संबंध सुधारण्याचे प्रयत्न करणाऱ्या महिला कालांतराने संबंध तोडण्याचाही निर्णय घेतात. अर्थात, अंतिम निर्णय घेण्याबद्दल महिलांचे मन डळमळीत असल्याचे अनेकदा दिसून येते. या डळमळीतपणाची अनेक कारणे असू शकतात. अनेकदा हिंसा करणाऱ्या व्यक्तींवर त्या आर्थिकदृष्ट्या अवलंबून असतात किंवा एकटे राहण्याची भीती असते (आपल्या चारित्र्यावर संशय घेतला जाईल असे वाटत असते), मुलांचा प्रश्न उद्‌भवतो, तर अनेकदा हिंसा करणाऱ्या व्यक्तीमध्ये सुधारणा होईल अशी त्यांना आशा असते. महिलेच्या मनातील चलबिचलीची कारणे पूर्णपणे समजून न घेताच समुपदेशिका अजाणतेपणे तिला अंतिम निर्णय घेण्यास उद्युक्त करु शकण्याचा धोका असतो. परंतु जर महिलेच्या डळमळीतपणाच्या कारणांबद्दल समुपदेशिकेस पूर्ण कल्पना असेल तर परिस्थिती हाताळण्याकरिता ती महिलेला अधिक सक्षम बनवू शकते.

### उ. लैंगिक अत्याचारांचा शोध

बहुतेक प्रकारच्या छळामध्ये लैंगिक हिंसेचा समावेश असतोच. महिला जेव्हा तिच्यावर होणाऱ्या हिंसेबद्दल बोलत असते तेव्हा समुपदेशिकेने लैंगिक हिंसेच्या शक्यतेचाही शोध घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परंतु लैंगिकतेविषयी बोलण्यास सामाजिक मान्यता नसल्याने पुरेसा विश्वास वाटल्याशिवाय महिला लैंगिक हिंसेविषयी सहजपणे बोलत नाहीत.

खुद्द समुपदेशिकेसही लैंगिकतेविषयी बोलण्यास मोकळेपणा वाटणे महत्त्वाचे ठरते. हा मोकळेपणा प्रशिक्षणातून येऊ शकतो. लैंगिक हिंसेचे सत्ता व नियंत्रणाच्या संदर्भ चौकटीमधील स्थान समुपदेशिकांना ओळखता आले पाहिजे. महिलांनादेखील त्यांना ते समजावून सांगता आले पाहिजे.

काही वेळा लैंगिक हिंसा सासरे, दीर किंवा वडील, भाऊ यांच्याकडून झाल्याचेही प्रसंग आढळतात. अशा घटनांबद्दल बोलताना महिलांना विश्वासपूर्ण सहाय्य मिळणे अत्यंत गरजेचे असते. त्यांच्या मनातील अपराधीपणाची भावना दूर करणे हे समुपदेशनाचे उद्दिष्ट असायला हवे. अशा प्रकारचे शोषण हे महिलांच्या शरीरावर हक्क प्रस्थापित करण्याच्या भावनेने केले जाते हे महिलेस समजावून दिले पाहिजे. लैंगिक हिंसेचा सामना करण्याकरिता समुपदेशनाद्वारे महिलांना त्याविषयी बोलण्यास सहाय्य केले पाहिजे व त्याविषयी वाटणाऱ्या शरम किंवा अपराधीपणाच्या भावनेतून त्यांना मुक्त केले पाहिजे. शारीरिक

हिंसेप्रमाणेच लैंगिक हिंसेचा सामना करण्याची महिलेची क्षमता समुपदेशिकेने अजमावून पाहणे गरजेचे आहे.

मायाचा नवरा नेहमीच दारु प्यायल्यानंतर लैंगिक संबंधाची मागणी करतो. तिला दारुचा वास असह्य होतो व लैंगिक संबंधाच्या वेळी वेदनाही होतात. आता ती रोज रात्री भजनाला जाऊन बसते व रात्री उशिरा घरी येते तोवर नवरा तडफडून झोपी गेलेला असतो. महिला अशा प्रकारचे निरनिराळे उपाय शोधून काढत असतात. ते जाणून घेणे हे समुपदेशनाचे उद्दिष्ट असले पाहिजे. समुपदेशिका मायाला असेही सांगू शकते की याबद्दल तिने घरातल्या एखाद्या व्यक्तीस विश्वासात घेऊन बोलावे जी व्यक्ती यामध्ये हस्तक्षेप करुन अधिक हिंसा रोखू शकेल.

ऊ. **हिंसेशी सामना**

हिंसेचे कारण आपण स्वत: नसून ते बाहेरील सामाजिक परिस्थितीत रुजलेले आहे हे मान्य करणे अनेक महिलांना कठीण जाते. हिंसा टाळण्याकरिता अनेक महिला त्या परिस्थितीतून स्वत:ला मिटून घेतात कारण तसे करण्याने हिंसेला कारण मिळणार नाही असे त्यांना वाटते. हिंसक व्यक्तीला खुश ठेवल्यास हिंसा थांबेल असे त्यांना वाटते. महिला या प्रकारच्या पद्धती अवलंबत आहेत काय याचा शोध समुपदेशिकेने घेतला पाहिजे. हिंसा तात्पुरती टाळण्याच्या युक्त्या हिंसा कमी करण्याकरिता यशस्वी ठरत नाहीत हे समुपदेशनातून स्पष्ट केले गेले पाहिजे. उलट हिंसेचा प्रतिकार केल्यास पुन्हा तसे करताना हिंसक व्यक्ती दोन वेळा विचार करते.

२३ वर्षे वयाच्या चंदाने लहानपणापासूनच तिच्या वडिलांकडून तीव्र हिंसा सहन केली आहे. ती लहान असतानाच तिची आई वारली. चंदाला तिच्या वडिलांची भयंकर भीती वाटते. ती सतत त्यांना खूष ठेवण्याचा प्रयत्न करते. ती टंकलेखिका म्हणून काम करते. चंदाचे वडील कोणत्याही लहानसहान कारणाने हिंसक बनतात, कधी तिला उशीर झाल्यामुळे, कधी तिने स्वयंपाक न केल्यामुळे तर कधी ती तिच्या मित्र-मैत्रिणींसोबत बाहेर गेल्यामुळे तिचा संपूर्ण पगार त्यांच्या स्वाधीन न केल्यामुळे देखील त्यांनी तिला मारहाण केली आहे. हिंसा टाळण्याकरिता चंदा घरी वेळेवर येते, वडिलांना राग येऊ नये म्हणून कामाव्यतिरिक्त कोठेही बाहेर जाणे तिने बंद केले आहे व घरातदेखील ती शक्यतो त्यांना टाळते. या सर्व पळवाटा आहेत हे समुपदेशिकेने चंदाला सांगितले पाहिजे. तिने जरी वडिलांना खूष ठेवले तरी कधीतरी हिंसा पुन्हा सुरु होणारच हे तिला पटविले पाहिजे. समुपदेशिकेने चंदाला हिंसेचा प्रतिकार करण्याचा पद्धती सुचविल्या पाहिजेत. एक पद्धत अशी असू शकेल की चंदाने तिच्या वडिलांना हे स्पष्ट सांगावे की ती संपूर्ण पगार त्यांच्या हातात देणार नाही कारण तिला स्वत:च्या भविष्याचाही विचार करावयाचा आहे.

**ऋ. महिलांची सामाजिक ओळख प्रस्थापित होण्याच्या प्रक्रियेचे अवलोकन**

विशिष्ट जात, धर्म, वर्ग, लैंगिक कल या विषयी समाजात रुढ असलेल्या समजुतींमुळे जे फायदे किंवा तोटे वाट्याला येतात त्यामुळे देखील हिंसाग्रस्त महिला विभागलेल्या असतात. त्यांच्या दुय्यम सामाजिक परिस्थितीमुळे महिलांना जे त्रास सहन करावे लागतात ते समुपदेशिकेने स्पष्ट करुन सांगितले पाहिजेत. त्याचप्रमाणे उच्च वर्ग, जात, बहुसंख्यांक, भिन्नलिंगी कल असलेल्या महिलांशी बोलताना समुपदेशिकेने त्यांच्या “इतर महिलांविषयी” असलेल्या पूर्वग्रहांबद्दल चर्चा केली पाहिजे. महिलांना विभागणाऱ्या ह्या विविध सामाजिक समजुतींचे अवलोकन करण्याची संधी समुपदेशनार्थीस स्त्रीवादी समुपदेशनाद्वारे मिळते.

# समुपदेशनाचे घटक

हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

### अ. संवादी नाते प्रस्थापित करणे

जेव्हा एखादी महिला रुग्णालयातील समुपदेशन केंद्रात येते तेव्हा बहुतेक वेळा रुग्णालयातील अन्य विभागाकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून तिची पाठवणूक केली गेलेली असते हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजेच ती समुपदेशनाची सेवा घेण्याच्या उद्देशाने थेट आलेली व्यक्ती नसते.

शिवाय हे केंद्र रुग्णालयामध्ये स्थित असल्याने ही सेवा डॉक्टर पुरवीत आहेत असा महिलांचा समज होऊ शकतो. त्यामुळे केंद्राची व दिल्या जाणाऱ्या सेवांची सविस्तर ओळख महिलांना करुन दिल्यास या विभागाचे स्वरुप व उद्दिष्ट यांची महिलांना स्पष्ट कल्पना येऊ शकेल.

येणाऱ्या महिलांबरोबर आलेल्या नातेवाईकांमध्ये तिच्यावर हिंसा करणाऱ्या व्यक्तीदेखील असू शकतात. म्हणूनच महिलांचे शारीरिक हावभाव/अशाब्दिक संवाद समजून घेणे समुपदेशिकेकरिता महत्त्वाचे ठरते. महिलेच्या अनेक अशाब्दिक खुणांवरुन तिला त्या वेळेस बोलता येईल की नाही हे व्यक्त होत असते. जर समुपदेशिकेला असे वाटले की महिलेला बोलायचे आहे, तर नातेवाईकांना नम्रपणे बाहेर थांबण्यास सांगितले पाहिजे. त्यांच्याशी नंतर बोलले जाईल असा विश्वास त्यांना दिला पाहिजे. जर तिच्या शारीरिक हावभावांवरुन समुपदेशिकेला असे वाटले की महिलेचे आता बोलणे शक्य होणार नाही तर समुपदेशिकेने केंद्राचे संपर्क तपशील कोणाच्याही नकळत महिलेस द्यावे. पाठवणूक करणाऱ्या व्यक्तींना अनेकदा हेही माहित नसते की ते हे सेवा नाकारु शकतात. कारण संमतीचा मुद्दा वैद्यकीय क्षेत्रात अनेकदा दुर्लक्षिला जातो. जर तिची इच्छा नसेल तर तिला समुपदेशनाकरिता बसणे सक्तीचे नसते हे देखील समुपदेशिकेने महिलेस सांगितले पाहिजे. त्याचप्रमाणे महिलेला जर काही काळानंतर यावेसे वाटले तर कोणत्याही वेळी ती येऊ शकेल याकरिता समुपदेशिकेने मुक्तद्वार धोरणाचाही अवलंब केला पाहिजे.

रुग्णालय स्थित समुपदेशन केंद्र असल्याने समुपदेशनाच्या कामाच्या नोंदी ठेवणे महत्त्वाचे ठरते. समुपदेशिका महिलेला पुढच्या टप्प्यावर भरावयाच्या नोंदणी अर्जाची आगाऊ कल्पना देऊ शकते. नजर संपर्क तुटू नये याकरिता समुपदेशिकेने महिलेच्या देखत तो अर्ज भरु नये. परंतु समुपदेशनाच्या दरम्यान काही नोंदी ठेवणे आवश्यक असेल याची कल्पना समुपदेशिकेने महिलेस दिली पाहिजे. यामुळे समुपदेशिकेस हिंसेच्या अनुभवाबद्दल स्पष्टता येण्यास मदत होते. बहुतेक वेळा येणाऱ्या महिला अन्य रुग्णालयातील अन्य विभागांकडून पाठवणूक झाल्यामुळे या विभागाकडे येतात. त्यामुळे त्यांना सवडीने समुपदेशन सत्राला बसण्याएवढा वेळ असण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे समुपदेशिकांना मर्यादित वेळामध्ये हिंसेची तीव्रता आजमावून समुपदेशनाची उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. रुग्णालयात काम करीत असल्याने, समुपदेशिकांना तीव्र इजा, जळणे किंवा हल्ला झालेल्या महिलाही पाहायला लागतात. अशा प्रसंगांतून जात असलेल्या महिलेशी बोलण्याकरिता समुपदेशिकांनी तयारी केलेली असली पाहिजे. संवादी नाते प्रस्थापित करण्याच्या टप्प्यावर महिला पूर्वी झालेल्या हिंसेबद्दल तपशीलवार सांगू शकेलच असे नाही, त्यामुळे समुपदेशिकेने गाळलेल्या माहितीविषयी नोंदी ठेवल्या पाहिजेत. पुढील सत्रांमध्ये ही माहिती भरुन काढता येऊ शकते.

अशा केंद्रांमध्ये रुग्णालयाच्या बाहेरील महिलादेखील मदतीकरिता येतात. हिंसाग्रस्त महिला जर थेट सहाय्य केंद्रातच आल्या, विशेषतः हिंसा नुकतीच घडली असल्यास, तर समुपदेशिकेने त्यांना रुग्णालयात जाऊन वैद्यकीय तपासणी व उपचार घेण्याचा सल्ला दिला पाहिजे. त्याकरिता समुपदेशिका स्वतः त्यांच्यासोबत देखील जाऊ शकते. अशा केंद्रात काम करीत असणाऱ्या

समुपदेशिकेस वैद्यकीय तपासणीच्या प्रक्रियेची माहिती समजावून सांगता येणेही आवश्यक असते. तीव्र शारीरिक हल्ला, जाळणे, बलात्कार, लैंगिक हल्ला यासारख्या बाबींमध्ये वैद्यकीय तपासणी व उपचार घेण्यास प्राधान्य दिले पाहिजे. परंतु समुपदेशिकेची उपस्थिती तसेच तपासणी व उपचारांबद्दल तिचे हिंसाग्रस्त महिलेस समजावून सांगणे यामुळे महिलेशी तिचे विश्वासाचे नाते उत्पन्न होऊ शकते.

## आ. सुरक्षा चाचणी व नियोजन

आरोग्य केंद्रात समुपदेशन सेवा उपलब्ध असल्याने येणाऱ्या महिला अनेकदा हिंसक प्रसंग घडल्यावरच आलेल्या असतात. काही वेळा हिंसेचे प्रमाण अतिशय तीव्र असते. महिलेला हिंसेचा तीव्र धोका आहे काय हे जाणून घेण्याकरिता सुरक्षा नियोजन करणे गरजेचे ठरते. आपत्कालीन समुपदेशनामध्ये सुरक्षा नियोजन हा एक महत्त्वाचा घटक असतो ज्यायोगे पुढील हिंसा रोखण्याकरिता किंवा तिचा प्रतिकार करण्याकरिता महिलांना एक साधन प्राप्त होते. हे बहुतेक वेळा दोन पातळ्यांवर केले जाते : एक म्हणजे, वाढत्या हिंसेचा शारीरिक धोका व दुसरे, वाढत्या हिंसेमुळे महिलांनी आत्महत्येचा प्रयत्न करण्याचा धोका. सुरक्षा चाचणी व नियोजन करताना :

१. *हिंसेची तीव्रता तपासणे*

महिलेने जर समुपदेशिकेस सांगितले की तिला लोखंडी सळीने किंवा काठीने मारले होते, तर हिसेंच्या तीव्रतेचा अंदाज घेण्याकरिता, यापूर्वी कधी तिला कोणत्याही वस्तूने मारहाण केली गेली होती काय हे तिला विचारावे. जर महिलेने ही पहिलीच वेळ असल्याचे सांगितले, तर याचा अर्थ आता तिला तीव्र हिंसेचा धोका पूर्वीपेक्षा अधिक आहे. मारहाण होण्यापूर्वी काय घडले होते हेदेखील समुपदेशिकेने तिला विचारावे. यातून हिंसेच्या कारणांवर थोडा प्रकाश पडेल. यापूर्वी मारहाणीतून तिने स्वतःचा बचाव कसा केला होता. मारहाण थांबविण्याकरिता कोण मध्ये पडले, तिला रुग्णालयात कोणी दाखल केले, अशा प्रकारच्या माहितीवरुन समुपदेशिकेस महिलेची हिंसेला प्रतिकार करण्याची क्षमता तसेच महिलेला उपलब्ध असलेले अन्य सहाय्य याची कल्पना येऊ शकते.

महिलेस यापूर्वीच्या मारहाणीच्या प्रसंगांचे वर्णन करायला सांगितल्याने तिने ते प्रसंग कसे हाताळले याची माहिती मिळू शकते. समुपदेशिकेने मारहाणीची तीव्रता तसेच वारंवारिता या दोन्हीविषयी प्रश्न विचारले पाहिजेत. प्रथम शाब्दिक हिंसेपासून सुरुवात होऊन, त्यानंतर थपडा मारणे, त्यानंतर वस्तू किंवा शस्त्र वापरुन मारहाण करणे, जीव घेण्याच्या धमक्या देणे अशा प्रकारे हिंसेत उत्तरोत्तर वाढ झाली आहे काय हे शोधल्यास हिंसेच्या तीव्रतेची कल्पना येऊ शकते. त्याचप्रमाणे हिंसा महिन्यातून एकदा, आठवड्यातून एकदा किंवा दररोज होते काय हेदेखील समुपदेशिकेने जाणून घेतले पाहिजे व अलिकडच्या काळात हिंसेच्या प्रसंगात वाढ झाली आहे काय हे बघितले पाहिजे. सुरक्षा आराखडा बनविण्याकरिता ही माहिती उपयुक्त ठरते.

२. *पर्याय सुचविणे*

महिलेवरील हिंसेची तीव्रता, हिंसक नात्यामध्ये ती कोणत्या टप्प्यावर आहे व हिंसेचा प्रतिकार करण्याची तिची किती तयारी आहे या सर्व बाबी लक्षात घेऊन समुपदेशिकेने प्रत्येक महिलेकरिता पर्याय सुचविले पाहिजेत. कारण प्रत्येक महिलेच्या स्वतःच्या नात्यामधून निरनिराळ्या अपेक्षा असतात.

राधाला तिच्या पगाराचे दिवस जवळ आले की आता आपल्याला नवऱ्याकडून मारहाण सुरु होणार याची आधीच जाणीव होते असे ती म्हणते. पुढचे काही दिवस घरात अतिशय तंग वातावरण असते असेही ती सांगते. समुपदेशिकाने राधाला सुचविले की पुढील काही दिवस तिने एखाद्या नातेवाईक/शेजारीपाजारी किंवा मैत्रिणीला घरी राहण्यास बोलवावे. असे केल्यास मारहाण थांबविण्याकरिता कोणीतरी मदत करु शकेल. ती व्यक्ती अशी असली पाहिजे की जिला तिचा नवरा मारहाण करण्यास धजावणार नाही. राधाला वाटणारी पोलिसांची भीती देखील समुपदेशिकेने हाताळली पाहिजे. तिने पोलिसात तक्रार करुन हे सांगितले पाहिजे की तिच्या जीवाला धोका असून तिला लोखंडी सळीने व काठीने मारहाण झाली आहे. राधाच्या परिस्थितीला योग्य ठरतील व तिला मान्य असतील अशा अनेक पद्धतींचा विचार केला गेला पाहिजे.

*३. तरुण मुलींना हाताळणे*

तरुण मुलींच्या बाबी असल्या की समुपदेशिकेस एका निराळ्या मानसिकतेची हाताळणी करावी लागते. अनेकदा आपण हिंसक नात्यामध्ये आहोत हेच मान्य करण्याची त्यांची तयारी नसते. विवाहित तसेच अविवाहित नातेसंबंधातील मुली, या दोन्ही बाबतीत हे आढळून येते. या महिलांमध्ये अपराधीपणा व स्वत:ला दोष देणे या प्रकारच्या भावना समुपदेशिकेस हाताळाव्या लागतात. समुपदेशनाच्या आमच्या अनुभवात आम्हाला असे आढळून आले की तरुण मुलींसमोर खूप कमी पर्याय उपलब्ध असतात. नवीन विवाह झालेल्या महिलेस कुटुंबाकडून होणाऱ्या हिंसेबद्दल कोणाशी बोलता येत नाही कारण तो आपलाच दोष आहे असे तिला वाटत असते. तिने जर घरच्यांच्या मनाविरुद्ध लग्न केले असेल व तिचा जोडीदार हिंसक निघाला असेल तर परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची होते. निकटच्या नात्यामध्ये होणाऱ्या हिंसेबद्दल बोलले तर ते नाते संपुष्टात येईल अशी महिलांना भीती वाटते, व स्वत:च्या आईवडिलांकडूनच जर हिंसा होत असेल तर त्याविषयी बोलण्यास महिलेस कोणतीच जागा उपलब्ध नसते.

रेश्माला आकाश या तिच्या मित्राने मारल्यावर ती समुपदेशिकेकडे आली. तिच्या गालावर खोल जखम होती. प्रसंगाचे वर्णन करताना ती म्हणते की तो तिच्यावर खूप मालकी हक्क गाजवितो, परंतु ते तिला आवडते कारण त्यावरुन त्याचे तिच्यावर खूप प्रेम आहे असे तिला वाटते. परंतु ती हेही मान्य करते की आतापर्यंत तिला अशा प्रकारे कोणीही मारले नव्हते. ती असेही म्हणते की नंतर त्याला तिला मारल्याबद्दल खूप वाईट देखील वाटते. अशा प्रसंगांमध्ये समुपदेशिकेस रेश्माच्या मते प्रेम म्हणजे काय असते याबद्दल, तसेच कोणत्याही परिस्थितीत हिंसेचे समर्थन करता येईल काय याबद्दल बोलावे लागेल. त्याच्या "मालकीहक्का"बद्दल आणखी सखोल प्रश्न विचारल्यावर असे कळले की त्याला तिने पारंपारिक पद्धतीचेच कपडे घातलेले आवडते व तो सोबत नसताना बाहेर गेलेले आवडत नाही. आपले प्रेम असलेल्या व्यक्तीला असे वागविणे योग्य आहे असे विचारुन तिला याविषयी विचार करण्यास उद्युक्त केले पाहिजे. तिला हेही विचारले पाहिजे की तो जेव्हा त्याच्या मित्रांबरोबर बाहेर जातो व तिला त्याबद्दल काहीही बोलण्याची परवानगी नसते तेव्हा तिला कसे वाटते. अशा प्रसंगी समुपदेशनामध्ये सुरक्षा चाचणी व नियोजन निराळ्या पद्धतीने समाविष्ट केले पाहिजे. पूर्वीचे असे प्रसंग आठविण्यास रेश्माला सांगितले पाहिजे. जेव्हा आकाशला

खूप राग आला होता. यातून तिला एक विशिष्ट आकृतिबंध लक्षात येईल व आपण हिंसक नात्यामध्ये आहोत हे ती हळूहळू मान्य करु शकेल. तिच्या सुरक्षेकरिता काही सूचना द्याव्या लागतील. उदा. एखाद्या विश्वासू व्यक्तीस हिंसेची कल्पना देऊन ठेवणे तसेच त्याने हिंसक वर्तन बंद करेपर्यंत त्याच्यासोबत एकटीने बाहेर न जाणे.

४. *हिंसाचक्र समजावून सांगणे*

महिलेच्या जीवनातील हिंसेची परिस्थिती समजून घेण्याकरिता हिंसाचक्र हे साधन अत्यंत उपयोगी पडते. महिलांच्या निरनिराळ्या कथनांमधून ही संकल्पना निर्माण झाली आहे. कोणत्याही महिलेस समुपदेशिकेने याबद्दल माहिती देण्यास हरकत नाही कारण त्यातून त्यांच्या जीवनातील हिंसेच्या प्रमाणाचा त्यांना स्वत:लाच अंदाज घेता येतो. हिंसक वर्तन चक्रीय असते व हे चक्र तोडल्याशिवाय हिंसा थांबणार नाही हे समजून घेणे महिलेकरिता महत्वाचे ठरते.

हिंसाचक्र समजून घेताना महिलेच्या जीवनातील उदाहरणांचाच उपयोग करुन घेता येईल. तिला हिंसेचा पहिला प्रसंग व त्यानंतर हिंसा करणाऱ्या व्यक्तीची प्रतिक्रिया आठवण्यास सांगावे. महिलेस हे समजवावे की एका टप्प्यावर घरातील वातावरण अतिशय तंग बनते. यानंतर वादावादी, भांडण व मग प्रत्यक्ष हिंसक कृती केली जाते. सुरुवातीच्या काळात हिंसक व्यक्तीला नंतर पश्चाताप होतो व कदाचित तो माफी देखील मागतो. याला "मधुचंद्र" टप्पा म्हणतात. ज्यामध्ये काही काळाकरिता हिंसक व्यक्तीच्या वागण्यात थोडी सुधारणा देखील होते. परंतु लवकरच हिंसा पुन्हा सुरु होते. आणि मग एक चक्र तयार होते - हिंसा, माफी, पुन्हा हिंसा, जसजशी हिंसेची तीव्रता व वारंवारिता वाढते तसतसे हे चक्र लहान लहान होत जाते. हिंसेचे चक्र तिने मोडल्याशिवाय अशा चक्राकार घटना घडतच राहतील व चक्र अधिकाधिक लहान होत घट्ट आवळले जाईल हे महिलेस समजावून सांगितले पाहिजे.

इ. **आत्महत्या**

महिलांनी आत्महत्येचा प्रयत्न करण्याची समस्या तिला सहन कराव्या लागणाऱ्या हिंसेशी जवळून संबंधित आहे. महिलांनी आत्महत्येचा प्रयत्न करण्याची अनेक कारणे असतात असे आम्हाला आढळून आले आहे. असह्य हिंसेपासून सुटका होण्याकरिता, मदतीची हाक म्हणून किंवा अतीव हिंसेमुळे जगण्याची इच्छा संपुष्टात आल्याने.

समुपदेशनार्थीच्या मनात आत्महत्येचा विचार आला आहे काय हे समुपदेशिकेने जाणून घेतले पाहिजे. सर्वच जणी हा विचार कृतीत उतरवतात असे नव्हे. पण अनेकजणी करतातही. म्हणूनच असा भावनांचा शोध घेतला पाहिजे. रुग्णालयामध्ये आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या महिलेस रुग्णालयातील समुपदेशिकेकडे पाठविले जाते. महिलांना याबद्दल बोलणे अत्यंत कठीण जाते हे लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय, अपराधीपणाची भावना, प्रयत्न अयशस्वी झाल्याबद्दल राग किंवा घराचे कोणीच भेटण्यास न आल्यास असहाय्यता अशा भावनांचे ओझे देखील त्यांच्या मनावर असते.

आत्महत्येच्या प्रयत्नाविषयी अधिक माहिती शोधण्याकरिता विशिष्ट कौशल्ये आवश्यक असतात. अशा प्रयत्नाबद्दल बोलणे कठीण असू शकते हे मान्य करुन व तसे बोलून दाखवून समुपदेशिकेने सुरुवात केली पाहिजे. महिलांची बाजू किंवा त्यांचे म्हणणे ऐकून घेणारे कोणीच नसते म्हणून महिला आत्महत्येचा प्रयत्न करतात असे म्हणणे देखील उपयुक्त ठरु शकेल. अनेक महिलांना त्यांच्या परिस्थितीवर मार्ग काढू शकणाऱ्या सेवा उपलब्ध आहेत हे माहित नसते म्हणून देखील आत्महत्येचे

प्रयत्न केले जातात. आधार देणारे संभाषण केल्यास महिला त्यांनी असा प्रयत्न करण्यामागील कारणे सांगण्यास उद्युक्त होऊ शकतील. तिची भावनिक अवस्था व भावना याबद्दल महिलेस विचारणे देखील समुपदेशिकेस उपयुक्त ठरु शकेल. तिची भावस्थिती, तिला दु:खी किंवा निराश वाटत आहे काय, किंवा रडावेसे वाटत आहे काय. तिला सोसाव्या लागणाऱ्या हिंसेमुळे असा प्रयत्न करण्याकडे ती ओढली गेली हे समुपदेशिकेने महिलेच्या लक्षात आणून दिले पाहिजे.

मेरीचे लग्न होऊन तीन महिने झाले होते. ती सांगत होती की त्यांच्या घरातील दिवे बंद झाले की लगेचच तिचा नवरा बळजबरीने लैंगिक संबंधांना सुरुवात करायचा. तिला त्यातून वेदना होत असत. त्यातून त्यांचे घर लहान होते व ते एकत्र कुटुंबात राहत असत. त्यामुळे तिला नवऱ्याशी लैंगिक संबंध करण्यास अवघड वाटत असे. एका रात्री बळजबरीच्या संबंधांच्या कल्पनेने तिला एवढी शिसारी आली की तिने जीवन संपविण्याचा प्रयत्न केला. येथे समुपदेशिकेने अवलोकनाचे तंत्र वापरावे. नवऱ्याला शरीर संबंध करण्यास नकार देणे अवघड असू शकते हे समुपदेशिकेने मान्य करण्याने मेरीस पाठींबा दर्शविला जाईल. तिच्या नवऱ्याचे वागणे योग्य नाही हेदेखील तिला सांगितले पाहिजे. तिला शरीरसंबंध नकोसे वाटतील तेव्हा तसे स्पष्ट सांगण्याचा आत्मविश्वास तिच्यामध्ये पुन्हा निर्माण केला पाहिजे. नवऱ्याशी लैंगिक संबंधांबद्दल बोलण्यास तिला प्रोत्साहित केले पाहिजे. त्याचबरोबर तिच्या आत्महत्येच्या प्रयत्नामागील कारण तिच्या कुटुंबियांना समजावून सांगण्यास देखील तिला प्रोत्साहित केले पाहिजे. स्वत:चे आयुष्य संपविण्याचे विचार पुन्हा पुन्हा मनात येऊ शकतात परंतु त्यावर विजय मिळविण्याची तंत्रे देखील उपलब्ध आहेत हे समुपदेशिकेने मेरीस समजावून सांगितले पाहिजे.

यास विचलनाचे तंत्र म्हणतात. आत्महत्येच्या प्रयत्नाचे दुष्परिणाम सांगताना एखाद्या औषधाच्या अतिसेवनामुळे तिच्या आरोग्यावर कसे विपरीत परिणाम होऊ शकतात हेदेखील तिला सांगितले पाहिजे. आत्महत्येचे विचार मनात आल्यास आपले मन आवडत्या गोष्टी करण्यामध्ये गुंतविण्यास तिला प्रोत्साहित केले पाहिजे. समुपदेशिकेस किंवा मैत्रिणीस भेटणे, फोन करणे यामुळे देखील मनातील आत्महत्येचे विचार दूर करण्यास मदत होऊ शकते हेही तिला सांगितले पाहिजे.

### ई. निवाऱ्याचा पर्याय

हिंसेच्या गंभीर घटनेनंतर जेव्हा एखादी महिला समुपदेशनाकरिता येते व आपल्याला परत जायचे नाही असे म्हणते तेव्हा समुपदेशिका तात्पुरत्या निवाऱ्याकरिता तिची पाठवणूक करु शकते जिथे ती घडलेल्या प्रसंगातून सावरु शकेल व भविष्यात कोणती पावले उचलावी याचाही विचार करु शकेल. एखाद्या औपचारिक निवारागृहाकडे पाठवणूक करताना समुपदेशिकेने तेथील नियम व अटींचीही कल्पना महिलेस दिली पाहिजे. संकटात मदत करु शकतील असे नातेवाईक, मित्रमैत्रिणी, नोकरीतील वरिष्ठ किंवा अन्य अनौपचारिक सहाय्यकर्ते यांचाही विचार करण्यास तिला प्रोत्साहित केले पाहिजे.

### उ. अहिंसेकरिता वाटाघाटी

अनेकदा महिला हिंसा करणाऱ्या व्यक्तींना ताबडतोब एकत्र बैठकीकरिता बोलावून घेऊन या प्रश्नावर त्वरित तोडगा काढण्याचा आग्रह धरतात. समुपदेशिकेने महिलेच्या भावनांना पाठींबा दिला पाहिजे. परंतु तिच्या हेही ध्यानात आणून दिले पाहिजे की तिची जीवन परिस्थिती व त्यातील वाटाघाटी करण्याच्या बाबी कोणत्या हे समजून घेणे देखील तितकेच महत्वाचे आहे. महिलेची व्यवस्थित तयारी नसेल तर एकत्र

बैठकीचा उपयोग होणार नाही. एकत्र बैठकीचा उद्देश हा वाटाघाटी करुन हिंसा थांबविण्याकरिता महिलेचा आत्मविश्वास वाढविणे हा आहे. म्हणूनच हिंसा करणाऱ्या व्यक्तीसोबत ज्या प्रश्नांवर चर्चा करावयाची आहे त्याविषयी तिची तयारी समुपदेशनाच्या सत्रांमध्ये करुन घेतली पाहिजे. तिच्या मागण्या शांतपणे व आत्मविश्वासपूर्वक मांडण्याकरिता समुपदेशन केंद्राची जागा महिलेस बळ देणारी वाटू शकते.

अशी बैठक घडवून आणण्याकरिता खालील काही कृती उपयुक्त ठरु शकतील :

१. महिलेची हिंसेशी निगडीत जीवनकहाणी तपशीलवार समजून घेण्याकरिता समुपदेशिकेस थोडा वेळ तरी चर्चेस मिळणे आवश्यक आहे.

२. या एकत्र बैठकीत तिला कोणाची उपस्थिती हवी आहे, पूर्वी असे प्रयत्न केले गेले आहेत काय, बैठकीत कोणते विषय हाताळावयाचे आहेत, हे प्रश्न समुपदेशिकेस एकत्र बैठकीची उद्दिष्टे निश्चित करण्यास उपयुक्त ठरतील. एकत्र बैठकीकरिता पाया पक्का करण्यास देखील महिलेला त्याची मदत होईल.

३. ती जे मुद्दे मांडणार आहे त्याची रंगीत तालीम देखील समुपदेशिकेने महिलेस करावयास लावावी. हे प्रसंगनाट्याच्या स्वरुपातही करता येईल. हे महत्वाचे आहे कारण दुसऱ्या बाजूच्या व्यक्ती महिलेचे खच्चीकरण करण्याकरिता तिच्यावर खोटे आरोपदेखील करु शकतात. अशा प्रकारच्या नाट्यामुळे तिला स्वतःला शांत ठेवण्याची तयारी करता येईल. समुपदेशिका संपूर्णपणे महिलेच्या बाजूने आहे व तिच्यावर समुपदेशिकेचा पूर्ण विश्वास आहे असे महिलेला सांगितल्यास महिलेला शांत राहण्यात व तिचा आत्मविश्वास वाढण्यात मदत होईल. या बैठकीचे रुपांतर कोण बरोबर व कोण चूक याविषयीच्या वादावादीमध्ये होणार नाही याची दक्षता समुपदेशिकेने घेतली पाहिजे. संपूर्ण बैठकीमध्ये उद्दिष्टांवर, अर्थात कोणत्याही परिस्थितीत हिंसा मान्य केली जाणार नाही हे स्पष्ट करणे, यावर लक्ष केंद्रित राहिले पाहिजे.

४. समुपदेशिकेने स्वतःची व स्वतःच्या संस्थेची ओळख करुन दिली पाहिजे. बैठकीचे उद्दिष्ट देखील स्पष्ट केले गेले पाहिजे. प्रत्यक्ष बोलणी जरी महिला व हिंसा करणाऱ्या व्यक्तींनी केली तरीही बैठकीवर समुपदेशिकेचे संपूर्ण नियंत्रण असले पाहिजे.

५. हिंसा करणाऱ्या व्यक्तीला प्रथम बोलावयास लावण्याचे धोरण अनेकदा फायदेशीर ठरते. हिंसा करणारी व्यक्ती समुपदेशन केंद्रात आली याचे कौतुक देखील समुपदेशिकेने केले पाहिजे कारण यावरुन हे लक्षात येते की त्यांना देखील नाते टिकविण्यामध्ये रस आहे. यामुळे हिंसा करणाऱ्या व्यक्तींना देखील नाते टिकविण्यामध्ये रस आहे. यामुळे हिंसा करणाऱ्या व्यक्तींना देखील थोडा मोकळेपणा वाटेल.

६. बैठकीच्या नोंदी ठेवल्या जातील व बैठकीस उपस्थित असलेल्या व्यक्तींनाही त्या नोंदीच्या प्रती दिल्या जातील हेदेखील सांगितले गेले पाहिजे.

७. अशा बैठकीचे उद्दिष्ट हे "तडजोड" करण्याचे किंवा हिंसक व्यक्ती व महिला यांच्यातील कलह "सामोपचाराने" मिटविण्याचे नसेल हे लक्षात ठेवले पाहिजे. असे केल्यास महिलेस आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाईल व कुटुंबाच्या तिच्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यात ती कशी कमी पडते आहे याचाच पाढा वाचला जाईल. असे झाल्यास हिंसा थांबविण्याकरिता करावयाच्या वाटाघाटींच्या प्रयत्नाचा पराभव होईल.

८. काही वेळा एकत्रित बैठकांचाही उपयोग होत नाही. समुपदेशिकेने महिलेस याची आगाऊ कल्पना देऊन ठेवली पाहिजे. तसे झाल्यास पर्यायी मागण्या काय असू शकतील हे ठरविण्याकरिता समुपदेशिकेने महिलेची आगाऊ तयारी करुन घेतली पाहिजे.

९. एखादे वेळी हिंसा करणारी व्यक्ती अचानक कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय हजर होऊ शकते. अशा वेळी एकत्र बैठक घेणे कठीण होते कारण महिलेने अद्याप बैठकीकडून असलेल्या स्वत:च्या अपेक्षा निश्चित केलेल्या नसतात. अशा वेळी समुपदेशिकेने नम्रपणे नकार देऊन बैठक पुढे ढकलली पाहिजे.

नीरजा ही २८ वर्षे वयाची महिला असून आर्थिक अडचणींमुळे तिचे लहान वयात सक्तीने लग्न करण्यात आले. तिचा नवरा श्रीमंत असून तिच्या सर्व भौतिक गरजा पूर्ण करीत असे. परंतु अलिकडे तो नीरजावर त्याच्या विवाहबाह्य संबंधांना तिने कोणतेही प्रश्न न विचारता मान्यता द्यावी याकरिता तिच्यावर दबाव टाकत आहे. नीरजाने समुपदेशिकेकडे एकत्र बैठक घेण्याची मागणी केली. नीरजाच्या नवऱ्याने यापूर्वी समूहपातळीवर झालेल्या बैठकींमध्ये एकत्र राहण्यास स्पष्ट नकार दिला होता व नीरजास त्याच्याबरोबर राहायचे असल्याने त्यामध्ये परस्परविरोधी हितसंबंध गुंतले होते. समुपदेशिकेने नीरजाला सांगितले की तिच्या भावना योग्यच असल्या तरीही दुसऱ्या व्यक्तीवर एखादे नाते आपण लादू शकत नाही. यामुळे तिच्यावर देखील वाईट परिणाम होतील कारण हिंसेमध्ये आधीच वाढ झालेली आहे. नीरजाचा संताप, निराशा व अपमानाच्या भावनांना वाट करुन देण्याकरिता समुपदेशिकेने तिला पुरेसा वेळ दिला. परंतु नीरजाचा एकत्र बैठकीचा आग्रह कायम होता. समुपदेशिकेने एकत्र राहण्याचा विषय हाताळण्याकरिता नीरजाची तयारी करुन घेतली. परंतु तिचा पती त्यास तयार होणार नाही असा समुपदेशिकेचा अंदाज असल्याने तिने नीरजास पर्यायी मागण्यांवर विचार करण्यासदेखील तयार केले. समुपदेशिकेने तिला नवऱ्याकडून कोणत्या भौतिक मागण्या करता येतील याबद्दल स्पष्टपणे विचार करण्यास सांगितले. एकत्र बैठकीमध्ये चर्चेमध्ये तिच्या मुलांकरिता आर्थिक तरतूद, घर तिच्या नावावर करणे, तिला मासिक पोटगी देणे यासारख्या मागण्या मांडण्याची सूचना समुपदेशिनकेने नीरजास केली.

### ऊ. पोलिसांची मदत घेण्याकरिता महिलेची तयारी

आपल्या खाजगी दडपणूकीबद्दल दुसऱ्याशी बोलणे हे एक अत्यंत धाडसी पाऊल असते. समुपदेशनाकरिता येणाऱ्या महिला निरनिराळ्या अपेक्षा घेऊन येत असतात. काही महिला पोलिसांनी मदत नाकारल्यावर येतात तर काही महिलांची औपचारिक तक्रार करण्याचीदेखील तयारी नसते. अर्थात, हे सत्य असते की हिंसक परिस्थिती असह्य झाली की महिलांना न्याय मागण्याच्या एखाद्या औपचारिक व्यवस्थेची गरज भासते. परंतु अनेकदा तिच्याकडे तिच्यावर होणाऱ्या हिंसेचा कोणताही ठोस पुरावा नसतो. म्हणूनच तक्रार नोंदविणे ही पुरावा जमा करण्यातील एक महत्वाची पायरी आहे.

१. काही महिला आपली "केस" सोडविण्याकरिता पोलिस ठाण्यावर अनेकदा गेलेल्या असतात. अशा प्रकरणांमध्ये काही वेळा पोलिस हिंसा करणाऱ्या व्यक्तीस ठाण्यावर बोलावून त्याला जबर शिक्षा होण्याची धमकी देतात. तर काही वेळा ते हिंसक व्यक्तीस काही काळापर्यंत कोठडीत डांबून ठेवून नंतर सोडून देतात. या बहुतेक कारवाया अनियोजित व तात्पुरत्या असतात. त्यांच्या आवश्यक त्या

नोंदीही केल्या जात नाहीत. अशा अनियोजित कारवाया कागदपत्रीय नोंदी टाळण्याकरीताच केल्या जातात. महिलेवर होत असलेल्या हिंसेचा पुरावा निर्माण करण्याकरिता कागदोपत्री नोंद असेल तर तक्रार महत्वाची ठरते हे समुपदेशिकेने महिलेस समजावून सांगितले पाहिजे.

२. त्याचबरोबर समुपदेशिकेने महिलेस पोलिसी कारवाईतून काय निष्पन्न झाले यावर विचार करण्यास सांगितले पाहिजे. महिलांना पोलिसांकडून आलेले अनुभव अनेकदा नकारात्मकच असतात असे आढळते. पोलिसांनी त्यांच्या प्रकरणावर काढलेला "तोडगा" हा अनेकदा मध्यस्थीचाच प्रकार असतो. बहुतेक वेळा पोलिसांची "मध्यस्थी" ही महिलांच्या विरोधातच जाते. त्यामुळे महिलांना समुपदेशिकेने जागरुकपणे विचार करायला लावला पाहिजे.

३. अनेकदा पोलिस महिलेच्या इच्छेविरुद्धच तक्रार दाखल करुन घेतात. याची अनेक कारणे असू शकतात. उदा. हिंसक व्यक्तीच्या जात, धर्म, वर्ग याविरुद्ध असलेला पोलिसांचा पूर्वग्रह. महिलेची पोलिसांकडे तक्रार करण्याकरिता पाठवणूक करताना समुपदेशिकेस या सर्वांची कल्पना असणे आवश्यक आहे. कोणतीही तक्रार ही महिलेची तशी मागणी असल्यासच केली जावी.

४. हिंसेच्या स्वरुपानुसार कोणत्या प्रकारची तक्रार केली जाऊ शकेल हे समुपदेशिकेने महिलेस समजावून दिले पाहिजे. या संदर्भात दखलपात्र व अदखलपात्र तक्रार यातील फरक महिलेस समजावून दिला पाहिजे. याचे कारण म्हणजे महिला अनेकदा पोलिसांना "मोठी" केस दाखल करण्यास सांगतात. तक्रार दाखल करताना दक्षता घेणे गरजेचे आहे. कारण अनेकदा त्याचे परिणाम महिलांनाच भोगावे लागतात. तसेच त्यामुळे हिंसेत वाढ होण्याचीही शक्यता असते. म्हणूनच फौजदारी तक्रार दाखल करण्यापूर्वी त्याविषयी महिलेस सर्व बाजूंनी सखोल माहिती देणे आवश्यक ठरते.

५. अनेकदा पोलिस ठाण्यामध्ये महिलांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. त्या जर वारंवार पोलिस ठाण्यात जात राहिल्या तर पोलिसांकडून त्यांची खिल्ली देखील उडवली जाते. किंवा त्यांना हाकलून देण्यात येते. म्हणून पोलिसांनी ठाण्यात जाताना महिलांनी आत्मविश्वासपूर्वक वागणे गरजेचे असते. जर पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेण्यास नकार दिला, तर तिला तिच्यावर झालेल्या हिंसक प्रसंगाचे सविस्तर वर्णन करणारा अर्ज लिहून तो पोलिसांना देण्यास सांगावे. त्यांनी तोही दाखल करुन घेण्यास नकार दिला तर तिला नकार देणाऱ्या पोलिसाचे नाव व बिल्ला क्रमांक लिहून आणण्यास सांगावे.

६. हिंसा अतिशय तीव्र झाल्याने जर एखाद्या महिलेने घर सोडले तर हिंसा करणारी व्यक्तीच तिच्याविषयी खोटे आरोप करते असे आढळून आले आहे. महिलेने घरातील वस्तू चोरुन नेल्या, ती मुलांना घेऊन गेली, ती घरी येण्यास राजी नाही इ. अशा प्रकारचे आरोप केले जातात. अशा वेळी तिला तिच्यावर झालेल्या हिंसेचे स्वरुप व घर सोडण्याची कारणे यांचे सविस्तर वर्णन करणारा अर्ज लिहिण्यास सांगावे. जर तिने घरातून तिच्या काही वस्तू बरोबर घेतल्या असतील तर त्यांचाही उल्लेख अर्जात करण्यास सांगावे ज्यायोगे हिंसा करणाऱ्या व्यक्तीस तिच्यावर अनाठायी आरोप करता येणार नाहीत.

### ऋ. अन्यत्र पाठवणूक करण्याची गरज

कौटुंबिक हिंसेचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे. म्हणूनच समुपदेशनातून काय निष्पन्न होईल याचा अंदाज करणे कठीण असते. या प्रक्रियेदरम्यान, महिलांना त्यांच्या आयुष्यातील इतर

कामे सुरुच ठेवावी लागतात. रुग्णालय स्थित समुपदेशन केंद्रामध्ये येताना महिलांच्या आर्थिक अपेक्षादेखील असतात. त्यांना औषधे, एक्सरे, मुलांचे शिक्षण, एखादा लहानसा/घरगुती उद्योग सुरु करणे, यासारख्या गोष्टींकरिता आर्थिक मदतीची अपेक्षाही असते. परंतु या संदर्भात समुपदेशन केंद्रावर असलेल्या मर्यादाही ध्यानात घ्याव्या लागतात. रुग्णालयात उपलब्ध असलेल्या काही संसाधनांचा वापर करुन समुपदेशिकेस औषधांचा किंवा एक्सरे चा खर्च माफ करुन घेता येतो, परंतु प्रत्येक गरजेकरिता आर्थिक मदत देणे समुपदेशिकेस शक्य नसते. अशा प्रसंगांमध्ये निरनिराळ्या प्रकारचे सहाय्य देणाऱ्या संस्थांचे जाळे उपलब्ध असणे महत्वाचे ठरते.

औषधांचा खर्च मुलांकरिता वसतिगृहे, मुले व महिलांकरिता निवारागृहे, महिलांकरिता रोजगाराची साधने, यासारख्या भौतिक संसाधने पुरविणाऱ्या संस्थांची यादी समुपदेशिकेने स्वतःजवळ बाळगल्यास ते अत्यंत उपयुक्त ठरेल.

त्याचप्रमाणे अन्य समुपदेशन केंद्रे, बाल मार्गदर्शन केंद्रे, व्यसनमुक्ती केंद्रे, मानसोपचार केंद्रे, समलिंगी व भिन्नलिंगी महिलांसोबत काम करणाऱ्या संस्था/गट व महिला सहाय्यता गट यासारख्या संस्था/सेवांची यादी देखील समुपदेशिकेजवळ उपलब्ध असली पाहिजे. त्यांच्यासारख्याच इतर महिलांसोबत संवाद साधण्याकरिता महिलांची अन्य संस्था/संघटनांकडे पाठवणूक केल्यास महिलांचे धैर्य व हिंसेचा सामना करण्याची त्यांची क्षमता वाढण्यास मदत होईल. दिलासामध्ये त्यांच्यावर झालेल्या हिंसेविषयी बोलण्याची संधी मिळाल्यानंतर अन्य हिंसाग्रस्त महिलांच्या संपर्कात आल्यास महिलांना त्या एकट्या नाहीत याची खात्री पटते. परंतु अन्यत्र पाठवणूक करताना त्या संस्था संघटनांचा हिंसा हाताळण्याबद्दलचा दृष्टीकोन देखील आपल्या संस्थेच्या दृष्टिकोनाशी मिळताजुळता असेल याची दक्षता घेतली गेली पाहिजे.

# विशिष्ट परिस्थितीमध्ये समुपदेशिकेची भूमिका

हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

अ. **बलात्कार**

लैंगिक हल्ला/बलात्कार झाल्याची तक्रार करणाऱ्या मुले/महिला जेव्हा रुग्णालयात येतात तेव्हा त्यांना अनेक प्रकारच्या चाचण्या/तपासण्या, त्यानंतर पोलिसांसमोर जबाब देणे व रुग्णालयातील अन्य प्रक्रियांना सामोरे जावे लागते. या सगळ्या प्रक्रियेमध्ये समुपदेशिकेची उपस्थिती महिलेला धीर देणारी ठरते. या चाचण्या/तपासण्या करण्यामागील उद्देश तसेच वैद्यकीय पुरावा गोळा करण्याची प्रक्रिया समुपदेशिकेने महिलेस समजावून सांगितली पाहिजे. या तपासण्या करण्याकरिता आवश्यक असलेल्या प्रक्रिया उदा. योनीवरील केसांचे नमुने, योनीमार्ग व गुददवारामधील स्त्रावांचे नमुने इ. बद्दल समुपदेशिकेने महिलेस आधीच समजावून सांगितले असल्यास महिलेची त्याकरिता मानसिक तयारी होते. तसेच महिलेने तिला झालेल्या सर्व प्रकारच्या इजांविषयी माहिती दिली आहे याची खात्रीही समुपदेशिकेने महिलेच्या निर्णयाचा आदर करताना तिला सदर प्रक्रियेचे फायदे आणि तोटे सांगून ती माहितीपूर्ण निवड करेल हे पाहणे गरजेचे आहे. बलात्काराविषयी तक्रार करण्याचे धैर्य दाखविल्याबद्दल समुपदेशिकेने महिलेचे कौतुक केल्यास तिचे मनोबल अधिक वाढण्यास मदत होईल.

बलात्काराची तक्रार दाखल करणाऱ्या महिलांना, जे घडले त्यास त्या मुळीच जबाबदार नसल्याची खात्री देणे व त्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवणे, हा बलात्कारित महिलेचे समुपदेशन करण्याचा पाया आहे. महिलेला नव्हे तर बलात्कार करणाऱ्या व्यक्तीला या घटनेची लाज वाटली पाहिजे असेही समुपदेशिकेने महिलेला सांगितल्यास तिला अधिक धीर मिळेल. समाजामध्ये बलात्कार होणे म्हणजे इज्जत गमावणे असे मानले जात असल्याने, समुपदेशिकेने बलात्काराची घटना व इज्जतीची संकल्पना या दोन्ही बाबी निरनिराळ्या केल्या पाहिजेत. बलात्कार हा महिलेने कोणालाही उत्तेजन दिल्यामुळे किंवा तिने घातलेल्या कपड्यांमुळे होत नसतो हे स्पष्ट केले पाहिजे. तो तिचा आवाज दडपण्याकरिता किंवा अपमानित करण्याकरिता केला जातो. बलात्कार हा एक तीव्र प्रकारचा शारीरिक हल्लाच असतो असे मानण्यात महिलेची मदत केली गेली पाहिजे. त्याचप्रमाणे तिला सन्मानपूर्वक जीवन जगणे शक्य होण्याकरिता समुपदेशिकेने मदत केली पाहिजे. बलात्कारासारख्या आघात करणाऱ्या अनुभवानंतर आयुष्य अत्यंत कठीण होते. समुपदेशिकेने महिलेला हे देखील सांगणे आवश्यक आहे की कदाचित तिच्या मनात आयुष्य संपविण्याचे विचार देखील डोकावतील, परंतु त्यावर तिने मात केली पाहिजे. (आत्महत्येवरील विभाग ४ इ मध्ये सांगितल्याप्रमाणे). बलात्कारानंतरचे समुपदेशन करण्यात तज्ज्ञ असलेल्या समुपदेशिकेकडे महिलेची पाठवणूक देखील करता येईल.

आ. **जळणे**

जळलेल्या महिलांना बहुतेक वेळा सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आणले जाते. रुग्णालयात आणताना त्यांच्याभोवती नातेवाईकांचा गराडा असतो. अनेकदा हे नातेवाईक हिंसा करणाऱ्यांपैकीच असतात व महिला सत्य परिस्थिती सांगत तर नाही ना याची खात्री करण्याकरिता आलेले असतात. अनेकदा जळण्याचे प्रमाण जास्त असल्याने महिलांना स्वतः जिवंत राहण्याची खात्री वाटत नसते. मुलांची काळजी ही देखील तिला भेडसावणारी महत्वाची समस्या असते. अनेकदा डॉक्टर व रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी तसे सांगितल्यामुळे महिला जगू शकणार नाही हे नातेवाईकांना कळलेले असते. महिलेला हे कळले नसल्यास, समुपदेशिकेने तिला ते हळुवारपणे परंतु स्पष्टपणे लक्षात आणून दिले पाहिजे. समुपदेशिकेने तिला सत्य परिस्थिती सांगण्याकरिता प्रोत्साहन दिले पाहिजे ज्यायोगे तिच्यावर अत्याचार करणाऱ्यांना शासन होऊ शकेल.

समुपदेशिकेने तिला घटनेबद्दल बोलण्यास तसेच पोलिसांकडे तक्रार करण्यासही प्रोत्साहित केले पाहिजे. डॉक्टरांना मृत्यूपूर्व जबानी देताना समुपदेशिकेची उपस्थिती महिलेस विशेष धीर देणारी ठरते. महिलेने कोणत्याही दबावाशिवाय जबानी देण्यात व त्यावेळी तिच्या सर्व नातेवाईकांना दूर ठेवण्यात समुपदेशिका महत्वाची भूमिका बजावू शकते. घटनेविषयी त्यांच्या मनात कोणत्याही प्रकारचा संशय असल्यास पोलिसांना माहिती देऊन तशी जबानी देण्यास तिच्या माहेरच्या मंडळींना देखील सांगितले गेले पाहिजे, ज्यायोगे पोलिस पुढील तपास करु शकतील.

### इ. मानसिक आजार

रुग्णालयांमधील मानसिक आजार असणाऱ्या महिलेला अनेकदा अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली जाते. अशा महिला स्वत:हून समुपदेशन केंद्रात येतात किंवा अन्य विभागांकडून त्यांची पाठवणूक केली जाते. समुपदेशिकेस मानसिक आजारांबद्दल पुरेशी माहिती असणे गरजेचे आहे. मानसिक ताण व मानसिक आजार यामध्ये खूप मोठा फरक आहे महिलेच्या जीवनातील विविध घटनांशी त्याचा संबंध असल्याने समुपदेशिकेस मानसिक ताण अनेक वेळा हाताळावा लागतो. छळ व मानसिक ताण यांचा घनिष्ठ संबंध असतो. हिंसेसंबंधीच्या त्यांच्या भावना व्यक्त करण्याकरिता समुपदेशिकेने महिलांना उद्युक्त केले पाहिजे. समुपदेशनाच्या दरम्यान महिला संताप, निराशा, दु:ख, असहाय्यता अशा अनेक भावना व्यक्त करतात. काही महिलांना समुपदेशिकेशी बोलल्यानंतर आपल्या भावनांवर नियंत्रण मिळविता येते तर काहींना आपल्या भावना आटोक्यात आणण्याकरिता अधिक वेळ लागू शकतो.

काही वेळा समुपदेशिकेस असे जाणवू लागते की ती महिलेपर्यंत पोहोचू शकत नाही आहे किंवा समुपदेशन प्रक्रिया भरकटत चालली आहे अशा वेळी महिलेचा सत्य परिस्थितीशी असलेला संबंध पडताळून बघणे गरजेचे असते. तिला साधेसेच प्रश्न विचारुन देखील हे पडताळून पाहता येते, उदा. ती दिवसभर काय करते, घरात कोणती कामे करते, इ. विषयी तिला विचारणे. यावरुन तिचा वेळ कसा जातो याची कल्पना येऊ शकते. समुपदेशनामधून महिलेच्या काय अपेक्षा आहेत याची उजळणी करणे देखील महत्वाचे ठरते. ज्यायोगे पुन: समुपदेशनावर लक्ष केंद्रित होण्यास मदत होते.

सुधा ही ५० वर्षीय महिला तिच्या अस्थिरोगावरील उपचारांकरिता रुग्णालयात येते. तिचा मुलगा व सून तिचा छळ करतात. परंतु सद्य परिस्थितीवर लक्ष केंद्रित करणे तिला कठीण जाते. उलट समुपदेशिकेशी बोलताना पुन्हा पुन्हा ती ७ वर्षापूर्वी वारलेल्या तिच्या मोठ्या मुलाविषयी दु:ख करीत राहते. समुपदेशनाच्या अनेक सत्रांमध्ये तिच्या मुलाच्या निधनाबद्दल बोलल्यानंतरदेखील सुधाला सध्या होत असलेल्या छळाविषयी बोलणे कठीण जाते. भराभर बोलणे, नजरेला नजर न देणे, हरविल्याप्रमाणे बघणे अशी काही लक्षणे देखील समुपदेशिकेच्या लक्षात आली. अशा बाबतीत महिलेची मानसशास्त्रज्ञांकडे किंवा मानसोपचार तज्ज्ञांकडे पाठवणूक करणे जरुरीचे असते.

परंतु अनेकदा प्रश्नांची पुर्नमांडणी देखील महिलेपर्यंत पोहतच नाही. महिलेचा सत्य परिस्थितीशी संबंध तुटत चालला आहे याचे हे एक लक्षण असू शकते. मानसिक आजार ओळण्याकरिता हे एक महत्वाचे साधन ठरु शकते. अशा वेळी मानसशास्त्रज्ञांकडे किंवा मानसोपचार तज्ज्ञांकडे पाठवणूक करणे जरुरीचे असते. परंतु अनेकदा महिला मानसोपचार तज्ञांकडे जाण्यास राजी नसतात कारण मानसिक त्रासाकरिता मदत मागण्याशी एक कलंक जोडलेला असतो. अशा प्रसंगात समुपदेशिकेने हे समजावून सांगणे गरजेचे असते, की जसा काही आघातांचा

आपल्या शरीरावर परिणाम होतो तसाच काही घटनांचा आपल्या मनावर देखील परिणाम होऊ शकतो. व याचा अर्थ ती महिला "वेडी" झाली आहे असा होत नाही. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेतल्याने सद्य परिस्थितीशी जुळवून घेण्यात तिची मदत होऊ शकते. याच्याशी संबंधित असलेला कलंक दूर करुन महिलेस मदत मागण्यास प्रोत्साहित केले गेले पाहिजे. समुपदेशिका महिलेसोबत मानसोपचार तज्ज्ञांकडे जाऊ शकते ज्यामुळे महिलेला आधार वाटू शकेल. हे गरजेचे असते कारण अनेकदा मानसिक आजार असणाऱ्या महिलांना कुटुंबाकडून कोणतेही सहाय्य मिळत नाही. यामुळे महिलेस मदत घेण्याकरिता प्रोत्साहन मिळते. त्याचप्रमाणे मानसोपचारांविषयी असलेले गैरसमज दूर करण्यात व औषधांचे अपेक्षित परिणाम व अतिरिक्त परिणाम महिलेला समजावून सांगण्यात देखील समुपदेशिकेस महत्वाची भूमिका बजावायची असते.

# समुपदेशनातील आव्हाने

हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

अ. रुग्णालय स्थित समुपदेशन केंद्रासमोर असलेले प्रमुख आव्हान म्हणजे आत्महत्या करणाऱ्या महिलांचे समुपदेशन. दर महिन्याला मोठ्या प्रमाणात महिला या वैद्यकीय तक्रारीकरिता दाखल होतात (सरासरी दिवसाला एक). समुपदेशन केंद्रातील माहितीच्या विश्लेषणातून असे आढळते की ह्या महिलांच्या लग्नाला एक वर्षदेखील पूर्ण झालेले नसते किंवा लग्न झालेले नसले तरी त्या निकटच्या नातेसंबंधांमध्ये गुंतलेल्या असतात. रुग्णालयात असताना समुपदेशिका त्यांच्या संपर्कात राहते परंतु एकदा रुग्णालय सोडून गेल्यानंतर त्यांचा पाठपुरावा करता येत नाही. या महिलांना समुपदेशनाची सर्वाधिक गरज असते. परंतु त्या केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाहीत. या महिलांशी संपर्क साधणे हे समुपदेशिकेसमोरील आव्हान ठरते.

आ. त्याचप्रमाणे, विवाह व कुटुंब संस्थांमध्ये महिलांना फार कमी पर्याय उपलब्ध असतात. हिंसक नातेसंबंधांमधील महिलेस समुपदेशन करण्याच्या संदर्भात, तिला उपलब्ध असलेले पर्याय अतिशय मर्यादित असतात. जर तिने त्या नात्यातून बाहेर पडण्याचे ठरविले तर तिला राहण्याच्या व जेवण्याच्या सोयीकरीता देखील मार्ग शोधावे लागतात. नात्यातून बाहेर पडण्याचे ठरविले तरी तिच्यावर मुलांच्या जबाबदारीचे ओझे असते. पर्याय शोधण्याची जबाबदारी महिलेवरच येऊन पडते हीच एक फार मोठी मर्यादा ठरते.

इ. समुपदेशनातील एक नित्याची घटना म्हणजे जोडीदाराची तयारी नसतानाही जोडीदाराबरोबरच राहण्याचा आग्रह धरणाऱ्या महिला. समुपदेशनासमोर हे एक मोठे आव्हान असते कारण वाढती हिंसा व त्यांच्या जीवाला असलेला वाढता धोका देखील नजरेआड करुन महिला नातेसंबंध तोडण्यास अजिबात तयार होत नाहीत व एकत्र राहण्याचाच आग्रह धरुन बसतात.

ई. महिलेने कायदेशीर मदत मागणे हे देखील एक आव्हान असते. आमच्या अनुभवानुसार कायदेशीर मदत मिळणे ही एक अत्यंत कठीण प्रक्रिया असून त्यातून सकारात्मक फलिते मिळणे अत्यंत दुरापास्त असते. कायदेशीर मदत व तिची उपजीविका, रोजगार याकरिता मदत यांचा समतोल राखणे गरजेचे असते. परंतु अनेक महिलांना असे वाटते की त्यांनी कायदेशीर कारवाई केली तर हिंसक व्यक्ती हिंसा बंद करेल. कायदेशीर कारवाई सोबतच तिच्या उपजीविकेवर देखील लक्ष केंद्रित करण्यास महिलेला सांगणे हे एक आव्हान ठरते.

उ. हिंसक नातेसंबंधातील अविवाहित महिलांपर्यंत पोहोचणे आव्हानात्मक ठरते. आम्ही जरी कौटुंबिक हिंसेच्या प्रश्नावर काम करीत असलो, ज्यामध्ये घरातील भाऊ, वडील, जोडीदार यापैकी कोणाही कडून महिलेवर केलेली हिंसा समाविष्ट आहे, तरी दिलासाकडे येणाऱ्या बहुतांशी बाबी या विवाहित महिलांवर होणाऱ्या हिंसेच्याच असतात.

# समुपदेशन केंद्र चालविण्याचे आचार नियम

हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

## हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांच्या समुपदेशनाकरिता मार्गदर्शक तत्वे

रुग्णालयातील समुपदेशन केंद्र रुग्णालयाच्या एखाद्या विभागाप्रमाणेच चालते. ज्याप्रमाणे रुग्णालयाच्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांच्या पाळ्या बदलतात त्याचप्रमाणे केंद्रातील समुपदेशिकांच्या देखील पाळ्या बदलतात. अशा प्रकारचे समुपदेशन केंद्र सुसूत्रपणे चालविण्याकरिता खाली काही आचार नियम दिले आहेत :

अ. केंद्रातील समुपदेशक म्हणून प्रशिक्षण दिलेल्या परिचारिका, समाजसेवक किंवा रुग्णालयातील अन्य कर्मचारी काम करु शकतात. समुपदेशन केंद्रात पाळावयाचा एक मूलभूत नियम म्हणजे त्या दिवशीच्या समुपदेशनाशी संबंधित सर्व नोंदींची टिपणे त्याच दिवशी पूर्ण केली पाहिजेत. याचे कारण म्हणजे अशा प्रकारच्या केंद्रात आदल्या दिवशीची समुपदेशिका दुसऱ्या दिवशी देखील तीच बाब हाताळण्यास उपलब्ध असेल असे नाही. त्यामुळे जर टिपणे व्यवस्थित पूर्ण केली असतील तरच कामावर असलेली दुसरी समुपदेशिका देखील योग्य ती सेवा पुरवू शकेल.

आ. समुपदेशिकेने महिलेस हे सांगणे गरजेचे आहे की कदाचित तिच्या पुढच्या भेटीत तिला दुसऱ्या एखाद्या समुपदेशिकेशी बोलण्याची महिलेची मानसिक तयारी होते.

इ. समुपदेशनास आलेल्या हिंसाग्रस्त महिलेस रुग्णालयातील अन्य सेवा उपलब्ध करुन देण्यामध्ये देखील समुपदेशिकेची महत्वाची भूमिका असते. याचे कारण बहुतेक रुग्णालये रुग्ण-स्नेही नसतात व महिला-स्नेही तर अजिबातच नसतात. म्हणूनच महिलेवर संवेदनशीलपणे उपचार केले जातील याची खातरजमा करण्यामध्ये समुपदेशिकेची भूमिका महत्वाची ठरते.

ई. समुपदेशनास आलेल्या हिंसाग्रस्त महिलेवर नजीकच्या काळात हिंसा झाली आहे काय हे समुपदेशिकेने विचारले पाहिजे व त्यावर उपचार घेण्यास तिची मदत केली पाहिजे. त्याचबरोबर, हिंसा झालेल्या बाबीची नोंद न्याय वैद्यकीय बाब म्हणून केली जात असल्याने त्या संदर्भात आवश्यक ती माहिती महिलेस देण्याची अतिरिक्त जबाबदारी देखील समुपदेशिकांवर असते. आपल्यावर हिंसा झाल्याचा पुरावा निर्माण करण्याकरिता याचा उपयोग महिलेस होऊ शकतो.

उ. समुपदेशिकेने महिलेस नोंदणी क्रमांक व समुपदेशन केंद्राची माहिती देणारे एक कार्ड देणे आवश्यक आहे. यामुळे तिची फाईल शोधणे समुपदेशिकेस सोपे जाते.

ऊ. दररोज केंद्रात नोंदल्या गेलेल्या नवीन बाबी व पाठपुरावा केलेल्या बाबी यासारख्या तपशिलांच्या नोंदणी वह्या समुपदेशिकांनी राखल्या पाहिजेत. यामुळे केंद्र हाताळत असलेल्या बाबींची संख्या समजण्यास मदत होते.

ऋ. समुपदेशनाच्या सर्व नोंदी गोपनीय राखायच्या असल्याने नोंदणी अर्ज योग्य त्या फाईल मध्ये लावून ती फाईल सुरक्षित ठिकाणी (कुलुपबंद कपाटात) ठेवणे ही समुपदेशिकेची जबाबदारी असते. हे अर्ज केवळ समुपदेशिकांनाच उपलब्ध असतात.

ल. केंद्रात कोणत्याही वेळी २ समुपदेशिका उपलब्ध असल्या पाहिजेत. याचे कारण रुग्णालयात येणाऱ्या महिलांकडे वेळ कमी असतो. आमच्या अनुभवानुसार बहुतेक महिलांना सरासरी ४० मिनिटांहून अधिक वेळ समुपदेशनाकरिता काढता येत नाही. केंद्रात एका वेळी दोन महिला आल्यास त्यांना जास्त वेळ थांबावे लागता कामा नये, अन्यथा त्या न बोलताच निघून जाण्याची शक्यता असते.

ए. हाताळलेल्या सर्व बाबींची समुपदेशिकांनी गटामध्ये अंतर्गत मांडणी व चर्चा करणे आवश्यक आहे. समुपदेशन करीत असताना पडणारे प्रश्न व शंका यांचे निरसन करुन

हिंसाग्रस्त महिलांचे हितसंबंध जास्तीत जास्त जपण्याकरिता समुपदेशिकांना ही एकमेव संधी उपलब्ध असते.

ऐ. रुग्णालय स्थित केंद्र असल्याने अन्य आरोग्य सेवा पुरवठादारांशी देखील समुपदेशिकांनी संवाद साधने गरजेचे असते. कारण बहुतेक वेळा डॉक्टर, परिचारिका व अन्य रुग्णालय कर्मचारीच रुग्णालयात येणाऱ्या महिलांची प्राथमिक चाचणी करुन त्यांची केंद्राकडे पाठवणूक करीत असतात. केंद्राच्या कामाची सर्वसाधारण माहिती, उदा. समुपदेशनाकरिता येणाऱ्या महिलांची संख्या, त्यांच्या वैद्यकीय तक्रारींचे स्वरुप इ. बद्दल समुपदेशिकांनी आरोग्य सेवा पुरवठादारांसोबत बोलले पाहिजे, जेणेकरुन त्यांना या विभागाच्या कामकाजाची कल्पना येईल. यामुळे दिलासा व अन्य रुग्णालयातील अन्य विभागांमध्ये “सुसंबद्धतेची” भावना निर्माण होईल.

ऐ. सनसनाटी बातम्या मिळविण्याकरिता प्रसारमाध्यमे रुग्णालयाकडे येत असतात. याविषयीचे निर्णय रुग्णालय प्रमुखांकडूनच घेतले जातील हे रुग्णालयाचे धोरण केंद्राने देखील अनुसरणे योग्य ठरेल. केंद्रात आलेल्या कोणत्याही बाबीची माहिती समुपदेशकांकडून प्रसार माध्यमांना दिली जाणार नाही. रुग्णालय प्रमुखांकडून दिलेली माहिती देखील सर्वसाधारण निरीक्षणांच्या स्वरुपातीलच असावी व कोणत्याही वैयक्तिक बाबीचे तपशील उघड केले जाऊ नयेत.

ओ. समुपदेशकांनी समुपदेशनार्थीना आपले वैयक्तिक दूरध्वनी क्रमांक देऊ नयेत.

औ. महिलेवर हिंसा करणाऱ्या नातलगांनी जर समुपदेशिकेस धमकी देण्याचा प्रयत्न केला तर रुग्णालयाच्या आवारात असणाऱ्या सुरक्षा रक्षक सेवकांना पाचारण करणे महत्त्वाचे ठरते.

# निष्कर्ष

समुपदेशनाच्या उपलब्ध असलेल्या अनेकविध पद्धती व कौशल्यांमध्ये योगदान देण्याचा एक नम्र प्रयत्न या पुस्तिकेद्वारे केला गेला आहे. आरोग्य संस्थांकडे येणाऱ्या कौटुंबिक व अन्य प्रकारच्या हिंसेच्या बाबींना प्रतिसाद देण्याकरिता अनुभवी समुपदेशकांना विविध पद्धती, रणनीती पुरविणे हे या पुस्तिकेचे उद्दिष्ट आहे. वाचकांच्या सर्व प्रतिक्रिया स्वागतार्ह ठरतील कारण तुमच्या प्रतिक्रिया व समुपदेशन पद्धतीमधूनच या पुस्तिकेत अधिक सुधारणा करणे शक्य होईल.

# संदर्भ


- अमेरिकन सायकोलॉजीकल असोसिएशन (एपीए) (१९८७) केस बुक ऑन एथिकल प्रिन्सिपल्स ऑफ सायकोलॉजीस्ट, वॉशिंग्टन डी.सी.: अमेरिकन सायकोलॉजीकल असोसिएशन, पृष्ठ क्र.१६
- बुरटे ए. (सप्टें. २००१-फेब्रु.२००२). सिक्स मंथ रिपोर्ट ऑफ काऊन्सेलिंग ॲट दिलासा (अप्रकाशित)
- चाप्लिन जे. (१९९९) फेमिनिस्ट काउन्सेलिंग इन एक्शन, २री आवृत्ती लंडन : सेज प्रकाशन, पृष्ठ क्र.१४४
- जेराल्ड सी. (२०००) थियरीज अँड प्रॅक्टिस ऑफ काऊन्सेलिंग अँड सायकोथेरपी ६वी आवृत्ती युनायटेड स्टेट्स : वर्डस्वर्थ पब्लिशिंग कंपनी, पृष्ठ क्र.५५०
- जॉन एस. प्लानागन एंड सेमर्स आर. (२००४) काऊन्सेलिंग अँड सायकोथेरपी थियरीज, कॉन्टेक्स्ट अँड प्रॅक्टिस : स्किल्स, स्ट्रॅटेजिस, टेक्निक्स, न्यूयॉर्क: जॉन वायली अँड सन्स, पृष्ठ क्र.५५२
- मारेसेक, जे. अँड क्रावेत्झ, डी. (१९९८), पॉवर अँड एजन्सी एन फेमिनिस्ट थेरपी. इन आय.बी. सेऊअंड एम.सी. हिनन (एड्स), फेमिनिझम अँड सायकोथेरपी, रिफ्लेक्शन्स ऑन कन्टेम्परी थियरीज अँड प्रॅक्टिसेस, लंडन: सेज पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र.४३-५६
- नेल्सन-जोन्स, रेचार्ड (२००२), एसेन्शिअल काऊन्सेलिंग अँड थेरपी स्किल्स: दि स्किल्ड क्लायंट मॉडेल, लंडन: सेज पब्लिकेशन, पृष्ठ क्र.३८२
- वॉरेल, जे. एंड रेमर, पी. (२००२), फेमिनिस्ट परस्पेक्टीव्हज इन थेरपी: एमपॉवरिंग डायव्हर्स विमेन, २री आवृत्ती, न्यूयॉर्क: जॉन वायली अँड सन्स, पृष्ठ क्र.३८३

# जोडपत्र १

## मुल्ये

- तुमच्या क्षमता व मर्यादांविषयी जागरुक राहा
- तुमच्या विचारांचे आत्मपरीक्षण करा
- लिंगभेदात्मक विचार ओळखा व ते हाताळा
- गोपनीयता राखा
- माहिती उघड करण्यापूर्वी महिलेची संमती घ्या
- प्रत्येक महिलेचा अनुभव एकमेव असल्याचे मान्य करा
- महिलांच्या ओळखीमधील विविधतेचा आदर करा
- महिलांच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेची दखल घ्या
- समुपदेशक-समुपदेशनार्थी नात्यातील सत्तासंबंध ओळखा
- पर्याय सुचविताना सामाजिक विषमतेविषयी जाणीव ठेवा

## तत्वे

- हिंसा ही सत्ता व नियंत्रण गाजविणाऱ्या पुरुषप्रधान संरचनेचे फलित आहे
- कुटुंब व विवाह यासारख्या संस्थांमधील अंतर्गत विरोधाभास तपासून पहा
- हिंसेमुळे शारीरिक व मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतात
- संदिग्धता तपासून पाहण्याची संधी द्या
- हिंसेबाबत कोणतीही तडजोड नसावी

## तंत्रे

- कारणीभूत घटक शोधा
- महिलेच्या निभाव यंत्रणेचा शोध घ्या
- तिच्या व्यक्तिगत दडपणूकीचा तिच्या लिंगभावात्मक ओळखीशी संबंध स्पष्ट करा.
- नाते अबाधित राखण्याच्या महिलेच्या इच्छेमागील कारणांची जाणीव ठेवून डळमळीतपणा हाताळा
- तिच्यावरील दोष दूर करा
- हिंसेचा सामना करण्याकरिता रणनीती आखा

## समुपदेशनातील आव्हाने

- आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या महिलेशी रुग्णालयात संपर्क साधणे
- कुटुंब व विवाह यासारख्या संस्थांमधील अंतर्गत विरोधाभास
- हिंसक जोडीदारासोबत त्याच्या इच्छेविरुद्ध एकत्र राहण्याचा महिलेचा आग्रह
- न्याय मागण्याच्या प्रक्रियेबद्दल महिलांचे दृष्टिकोन
- विवाहा व्यतिरिक्त नात्यांमधील महिलांच्या बाबी हाताळणे

## समुपदेशन केंद्र चालविण्याकरिता आचार नियम

- समुपदेशनाशी संबंधित सर्व टिपणे त्याच दिवशी पूर्ण करा
- पुढच्या भेटीमध्ये गटातील अन्य समुपदेशिका भेटण्याच्या शक्यतेबद्दल महिलेस माहिती द्या
- महिलेवर नजीकच्या काळात हिंसा झाली असल्यास, तिला वैद्यकीय उपचार घेण्यास साहाय्य करा
- महिलेला रुग्णालयातील अन्य सेवा मिळविण्यास मदत करा
- न्याय वैद्यकीय नोंदणीचे महत्व स्पष्ट करा
- महिलेवर हिंसा करणाऱ्या नातलगांनी धमकी दिल्यास रुग्णालयाच्या आवारात असणाऱ्या सुरक्षा सेवेस पाचारण करा
- कोणत्याही वेळी केंद्रात दोन समुपदेशिका उपस्थित असतील याची काळजी घ्या
- समुपदेशिकांच्या गटामध्ये हाताळत असलेल्या बाबींची नियमितपणे मांडणी व चर्चा करा
- समुपदेशनाच्या नोंदी गोपनीय ठेवा
- नव्याने दाखल झालेल्या व पाठपुरावा करीत असलेल्या बाबींच्या संख्येची नोंद ठेवा

*हे जोडपत्र निर्माण करण्याकरिता आरती चंद्रशेखर यांची मी आभारी आहे*

# जोडपत्र २

## महिलांवरील हिंसेशी संबंधित भारतातील कायदे

१. **कौटुंबिक हिंसेपासून महिलांची सुरक्षा कायदा २००५**
हा कायदा विवाहित, अविवाहित, लग्नाशिवाय जोडीदाराबरोबर एकत्र राहणाऱ्या महिलांना लागू आहे तसेच वडील किंवा भाऊ यांच्याकडून हिंसा होणाऱ्या महिलांना देखील लागू आहे. यामध्ये सर्व जातीधर्माच्या महिला समाविष्ट आहेत तसेच सर्व प्रकारच्या हिंसा देखील समाविष्ट आहेत. उदा. शारीरिक, लैंगिक, भावनिक व आर्थिक हिंसा, कौटुंबिक हिंसा होत असलेली महिला सुरक्षा अधिकारी/सेवा पुरवठादार/दंडाधिकारी यांच्याकडे तक्रार करु शकतात. या कायद्याद्वारे महिलांना निरनिराळ्या आदेशांच्या स्वरुपात फायदा मिळू शकतो. उदा. राहण्याच्या घराविषयक आदेश, आर्थिक मदत, ताबा घेण्याचा आदेश, भरपाईचा आदेश, मध्यावधी/एक्स पार्टी आदेश इ.

२. **भारतीय दंड विधानातील कलम ४९८ अ**
या कलमाखाली, तिचा छळ करणाऱ्या नवऱ्याविरुद्ध व/किंवा त्याच्या नातेवाईकांविरुद्ध महिला तक्रार दाखल करु शकते. तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्यास, किंवा तिच्या जीवाला वा शरीराला धोका जाणवल्यास किंवा मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तूंची मागणी तिच्याकडून केली जात असल्यास देखील ह्या कलमाखाली तक्रार केली जाऊ शकते. गुन्हा करणाऱ्या व्यक्तीस तीन वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते व दंड देखील केला जाऊ शकतो.

३. **हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१**
हा कायदा देण्यावर किंवा घेण्यावर बंदी घालतो अशी मागणी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे असा विवाह करणाऱ्या व्यक्तीस एक महिन्यापर्यंत साधा कारावास, किंवा एक हजार रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही केले जाऊ शकते. जर त्या व्यक्तीने हा बालविवाह आहे हे आपल्याला माहित नसल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केले तरच यातून मुक्तता मिळू शकेल.

४. **बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२९**
बालवयात होणाऱ्या विवाहांना थांबविण्याकरिता या कायद्याचा वापर केला जातो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे असा विवाह करणाऱ्या व्यक्तीस एक महिन्यापर्यंत साधा कारावास किंवा एक हजारपर्यंत दंड किंवा दोन्ही केले जाऊ शकते. जर त्या व्यक्तीने हा बालविवाह आहे हे आपल्याला माहित नसल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केले तरच यातून मुक्तता मिळू शकेल.

५. **गर्भपूर्व व प्रसूतीपूर्व चाचणी (लिंगनिवड चाचणी प्रतिबंधक) कायदा १९९४**
हा कायदा गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर लिंग निवड करण्यास प्रतिबंध करतो. गर्भामधील व्यंगे शोधता यावीत व गर्भलिंग निवड करण्याकरता गैरवापर होऊ नये म्हणून प्रसूतीपूर्व चाचण्यांच्या तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या आरोग्य व्यावसायिकांवर नियंत्रण ठेवण्याकरिता या कायद्याचा वापर केला जातो. अशा चाचण्या केल्या जात असल्याचे कोणालाही आढळल्यास योग्य त्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली जाऊ शकते.

*हे जोडपत्र निर्माण करण्याकरिता रश्मी दिवेकर यांची मी आभारी आहे*

६. **कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरोधी (प्रतिबंध, मज्जाव व तक्रार निवारण) कायदा, २०१३**

महिलांच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ होत असल्यास तक्रार करण्याकरता महिला या कायद्याचा वापर करु शकतात. या कायद्यानुसार प्रत्येक कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची प्रकरणे हाताळण्याकरिता एक समिती गठीत करणे बंधनकारक आहे जेथे छळ होणारी महिला तक्रार करु शकते. अशी समिती अस्तित्वात नसल्यास महिला प्रत्येक तालुक्यात स्थापन केलेल्या तक्रार निवारण समितीकडे जाऊ शकते. महिला लेखी तक्रार दाखल करुन बदली, अधिक रजा यासारख्या सवलतींची मागणी करु शकते.

७. **सती प्रतिबंधक कायदा १९८७**

सती जाण्यास, सती जाण्याकरिता उत्तेजन देण्यास किंवा सती जाण्याचा गौरव करण्यास या कायद्याद्वारे बंदी घालण्यात आली आहे. अशा प्रकारचा गुन्हा घडल्यास खटला चालविण्याकरिता विशेष न्यायालयांची तरतूद केली गेली आहे. यामध्ये मृत्युदंड, जन्मठेप, कारावास व तीस हजार रुपयापर्यंत दंड केला जाऊ शकतो. अशा प्रकारच्या गुन्ह्याची दखल प्रतिबंध जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी घेऊ शकतात.

८. **बलात्कार - कलम ३७५, भारतीय दंड संहिता**

बलात्काराच्या कायद्यात (कलम ३७५) फौजदारी कायदा सुधारणा (क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट-सी एल ए) म्हणून २०१३ मध्ये काही बदल करण्यात आले. यात बलात्काराची व्याख्या अधिक विस्तृत करण्यात आली असून त्यात सर्व प्रकारच्या लैंगिक हिंसेचा म्हणजे-अंतरप्रवेश वस्तू/ शस्त्रे/ बोटे/ वापरुन केलेला (मौखिक, गुद्द्वारातील, योनिमार्गातील अंतरप्रवेश) किंवा अंतरप्रवेशा शिवाय स्पर्श करणे, कुरवाळणे, पाठलाग करणे यांचा समावेश केला गेला आहे. तसेच महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध यापैकी काहीही करायला लावणे हे हि या कायद्याच्या कक्षेत येते. सामुहिक बलात्कार (कलम ३७५ ड) हा एक स्वतंत्र गुन्हा कठोर शिक्षेसह यात अधिनियमित करण्यात आला आहे.

९. **महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेला बळाचा वापर किंवा हल्ला, भारतीय दंड विधानाचे कलम ३५४**

महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेला बळाचा वापर किंवा हल्ला, याकरता १ वर्ष ते ५ वर्षापर्यंत कारावास आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते. भारतीय दंड विधानानुसार बलाचा वापर करुन एखाद्या महिलेस विवस्त्र करणे, चोरुन अश्लील दृश्य किंवा खाजगीतील वर्तन पाहणे व पाठलाग करणे हे शिक्षेस पात्र आहे.

१०. **बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण कायदा २०१२ (पोक्सो)**

हा कायदा बालकांकरीता (१८ वर्ष खालील) असून लैंगिक हेतूने करण्यात आलेली सर्व कृत्ये यात शिक्षेस पात्र आहेत जसे अंतः प्रवेश असलेला लैंगिक हल्ला, लैंगिक हेतूने अंतः प्रवेश न करता हि केलेला शारीरिक स्पर्श, लैंगिक छळ, अश्लील साहित्य निर्मिती करता बालकांचा वापर. हा कायदा दोन्ही लिंगाच्या बालकांचे संरक्षण करतो तसेच यात बालकांच्या इच्छेचा विचार केला जात नाही.

*हे जोडपत्र निर्माण करण्याकरिता रश्मी दिवेकर यांची मी आभारी आहे*

# जोडपत्र ३

## मुंबई

**विमेन्स सेंटर हेल्थ प्रोजेक्ट**
१०४, बी, सनराईज अपार्टमेंट, नेहरु रोड, वाकोला,
सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५.
दूरध्वनी क्र. २६६८५९९७/२६१४०४०३/२६६८०४०३
womcentr@vsnl.com

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
पोलीस आयुक्त कार्यालय,
पोलीस मुख्यालय, रुम नं.३६, ए ब्लॉक, गेट नं.५,
क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. २२६२०१११, विस्तारित क्र. २०६
rc_vaw@tiss.edu

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
कांदिवली पोलीस स्टेशन, स्वामी विवेकानंद रोड,
शताब्दी रुग्णालयासमोर, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०६७.
दूरध्वनी क्र. २४६९१७५३

**स्नेहा (सोसायटी फॉर न्युट्रिशन, एज्युकेशन अँड हेल्थ ऍक्शन)**
३१०, ३रा मजला, अर्बन हेल्थ सेंटर, ६० फीट रोड,
धारावी, मुंबई-४०० ०१७.
दूरध्वनी क्र. २४०४२६२७/२४०४००४५/२४०८६०११/२६१४४८८

**सख्य - महिला मार्गदर्शन कक्ष**
ठाणे सिविल हॉस्पिटल, तळमजला, ठाणे.
संपर्क : ज्योती - ९२२४६४२५६०

**आवाज - ए - निस्वान**
रेहनुमा लायब्ररी सेंटर, दारुल-फलाह बिल्डींग,
१ला मजला, सी विंग, रुम नं.१०२, किस्मत सोसायटी समोर,
कौसा, मुंब्रा, ठाणे.
दूरध्वनी क्र. ०२२-२५४९००३८
rehnumacentre@gmail.com

**स्त्री मुक्ती संघटना कुटुंब समुपदेशन केंद्र**
मातोश्री रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृहाजवळ,
रामकृष्ण चेंबूरकर रोड, चेंबूर नाका, मुंबई-४०० ०७१.
दूरध्वनी क्र. २५२९७१९८

**स्वाधार केशव गोरे स्मारक ट्रस्ट**
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, आरे रोड,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०० ०६२.
दूरध्वनी क्र. २८७२४१२३

**मैत्र हेल्पलाईन**
श्री गणेश दर्शन, ९वा मजला, आयपीएच, एलबीएस मार्ग,
महाराष्ट्र प्लायवूड सेंटरच्या समोर,
हरी निवास सर्कल, नौपाडा, ठाणे (पश्चिम)-४०० ६०२.
दूरध्वनी क्र. २५४३३२७०/२५३६६५७७/२५४२८१८३
iph@healthymind.org

**दिलासा**
विभाग क्र. १०१, गायनिऍक ओपीडी, के.बी. भाभा हॉस्पिटल,
आर.के. पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०० ०५०.
दूरध्वनी क्र. थेट : २६४००२२९/२६४२२७७५/२६४२२५४१
विस्तारित क्र. ४३७६
dilaasa@vsnl.net

**महिला व मुलांकरिचा सहाय्य कक्ष**
दादर पोलीस स्टेशन, भवानी शंकर रोड, सैतान चौकी,
दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.
दूरध्वनी क्र. २४१४०३०३/२४६९१६८१/२५५२५७५७
विस्तारित क्र. १८१

**महिला व मुलांकरिचा सहाय्य कक्ष**
सी.बी.डी. बेलापूर पोलीस स्टेशन, सेक्टर १,
सी.बी.डी. बेलापूर बस डेपोच्या समोर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी क्र. २७५८०२५५

**सख्य - महिला मार्गदर्शन कक्ष**
दि इमेज - १ला मजला, निर्मल नाका, नालासोपारा,
तालुका वसई, जिल्हा-ठाणे.
दूरध्वनी क्र. ९५२५०-२४७१५४०/९८९०३१२४०२
mcfhi@vsnl.net

**आवाज ए निस्वान**
४७/१, सारबाई हसन अली रुपवाला,
मोरेश्वर पाटणकर महापालिका शाळा, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०० ०७०.
दूरध्वनी क्र. २६५२१८२५/९८१९६५६८६०/९८६७२१३२९८
niswan@vsnl.net

**स्त्री मुक्ती संघटना श्रमिक, रॉयल क्रेस्ट**
३१, श्रमिक, रॉयल क्रेस्ट, १ला मजला, दादर क्लबच्या समोर,
लोकमान्य टिळक वसाहत रोड नं.३, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी क्र. २४१७४३८१

**स्त्री मुक्ती संघटना कुटुंब समुपदेशन केंद्र**
सेक्टर ३, सिडको कम्युनिकेशन सेंटर,
वाशी पोलीस स्टेशन जवळ, वाशी, नवी मुंबई-४०० ७०९.
दूरध्वनी क्र. २७८२१५६४

**आसरा**
ए-४, तन्वर व्हिव सीएचएस,
प्लॉट ४३, सेक्टर ७, कोपरखैराणे, नवी मुंबई-४०० ७०१.
दूरध्वनी क्र. २७५४६६६७/९८२०४६६७२६
johnsont307@rediffmail.com

## पुणे

**सुसंवाद - सखी हेल्पलाईन**
बी-१, सीमा अपार्टमेंट, शिरोळे रोड, शिवाजी नगर, पुणे-४११ ००४.
दूरध्वनी क्र. ०२०-२५४३८४३४

**नारी समता मंच**
४७३, टिळक रोड, सदाशिव पेठ,
न्यू इंग्लिश शाळेच्या गल्लीजवळ, पुणे-४११ ०३०.
दूरध्वनी क्र. ०२०-२४४७३११६
nsm@pn3.vsnl.net.in

**स्वाधार**
द्वारा - निवारा डेव्हिड ससून अनाथ पंगु गृह,
९६, नवी पेठ, पुणे - ४११ ०३०.
दूरध्वनी क्र. ०२०-२४५३३४५२
swadhar@rediffmail.com / contact@swadharpune.org

**माहेर**
भीमा कोरगाव, वडू बुद्रुक, तालुका-शिरुर, जिल्हा-पुणे-४१२ २१६.
दूरध्वनी क्र. ९५२१३७-२५२१७४
maheropn3@vsnl.net.in/ maherpune@gmail.com

**आशा संस्था**
ऍक्शन फॉर सेल्फ रिलायंस होप अँड अवेअरनेस,
विश्रामबाग पोलीस स्टेशन, फरासखाना बिल्डींग,
३रा मजला, बुधवार चौक, पुणे-४११ ००२.
दूरध्वनी क्र. ९५२०-२४४८४५३५
ngoasha@gmail.com

**मासूम संचलित संवाद - कुटुंब समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र**
म्हाळसाकांत सोसायटी, सासवड, तालुका-पुरंदर, जिल्हा-पुणे.
दूरध्वनी क्र. ०२११५-२२२९६९

**चैतन्या महिला मंडळ**
१३, गुरुराज सोसायटी, भोसरी, पुणे-४११ ०३९.
दूरध्वनी क्र. ९५२०-२६६१०५१६/०९४२२०४१५२/०८४११००४१८०
jyotipathania@yahoo.co.in

**श्रमिक सेवा विनिमय केंद्र**
१०१, शिवाजीनगर, मंगला सिनेमागृहाजवळ, पुणे-४११ ००५.
दूरध्वनी क्र. ९५२०-२५५३३५६०/२५५३४६५२
घर : २३३५२०५३/०९४२२५३०१८६

## दिल्ली

**जागोरी - ए विमेन्स ऑर्गनायझेशन**
सी-५४, साउथ एक्स्टेन्शन, पार्ट टू, नवी दिल्ली
दूरध्वनी क्र. ९१ ११ २६६९१२१९/+९१ ११ २६६९१२२०
jagori@jagori.org

**तार्शी**
सी-२९, तळघर, कैलासच्या पूर्वेला, नवी दिल्ली-११० ०६५.
दूरध्वनी क्र. ९१ ११ २४३७९०७०/२४३७९०७१/०११ २६३२४०२३
tarshi@vsnl.com

**राही फाऊंडेशन**
एम ५०, चित्तरंजन पार्क, तळमजला, नवी दिल्ली-११० ०१९.
दूरध्वनी क्र. ०११ ४०५३६१७६/०११ २६२७४०४१
rahifoundation@gmail.com

**ऍक्शन इंडिया**
५/२७ए, जंगपुरा बी, राजदूत हॉटेलच्या मागे, नवी दिल्ली-११० ०१४.
दूरध्वनी क्र. ९१ ११ २४३७७४७०/२४३७४७८५
actionindia@vsnl.com, actioni@hotmail.com

**शक्ती शालिनी**
६/३० बी, लोअर ग्राऊंड फ्लोर, कारगिल पार्क लेन जवळ,
जंगपुरा बी, नवी दिल्ली-११० ०१४.
दूरध्वनी क्र. ९८९९५२२८८९/९७११०५३७०६/
(९१)११ २४३७२४३७/२४३७३७३७
shakishalini@mantraonline.com

## वडोदरा

**ओळख - अ स्पेस फॉर विमेन अ फेमिनिस्ट डॉक्यूमेंटेशन रिसोर्स ॲण्ड कौन्सेलिंग सेंटर**
८-अ, निवृत्ती कोलोनी, जिला तालीम भवनच्या समोर,
विरोक हॉस्पिटल आणि उपेन्द्रचार्या आश्रम दोहोंच्या मध्ये,
आर्य कन्या विद्यालय रोड, करेलीबाग, वडोदरा.
दूरध्वनी क्र. ०२६५-२४८६४८७/२४६६०३७
Olakh.space@gmail.com

## बंगलोर

**विमोचना**
नं. ३३/१-१०, ४था क्रॉस, त्यागराज ले आऊट,
मारुती नगर, बंगलोर-५६० ०३३.
दूरध्वनी क्र. ०८०-२५४९२७८३/२५४९२७८१/
२५४९४२६६/२५४९२७८२
streelekha@vsnl.net

**हेन्गासारा हक्कीना संघ**
१०२४, ४था टी ब्लॉक, ३८वा क्रॉस,
२५वा मेन, जयनगर, बंगलोर-५६० ०४१.
दूरध्वनी क्र. ०८०-२६६३९८८४
hhs@bgl.vsnl.net.in

## गुजरात/कच्छ

**कच्छ महिला विकास संघटना**
५-एस.टी. कॉलोनी शक्ती कृपा, जुम्मार हाऊस जवळ,
व्ही.डी. हायस्कुल रोड, कच्छ, जिल्हा-३७० ००१.
दूरध्वनी क्र. ०२८३२-२२२१२४/२२३३११/२५५१२५

**उजस महिला विकास संघटना, मुंद्रा जिल्हा**
सदौ रोड, केव्हीके कॅम्पस, मुंद्रा, कच्छ.
दूरध्वनी क्र. ०२८३८-२२३१०४

**अबदासा महिला विकास संघटना**
शिद्धेश्वर नगर, पोस्ट ऑफिसच्या मागे, नलिया कच्छ-३७० ००१.
दूरध्वनी क्र. ०२८३१४-२२२१६५

**सेंटर फॉर सोशल जस्टीस - भूज**
१०, मेघमाया, शारधा सोसायटी, भूज, कच्छ.
दूरध्वनी क्र. ०२८३२-२२३४४१
csjkutch@rediffmail.com

## कोलकाता

**स्वयंम**
९/२ बी, देओदार स्ट्रीट, कोलकाता-७०० ०१९.
दूरध्वनी क्र. ९१ ३३ २४८६३३६७/३३६८/३३५७
swayam@swayam.info

## जयपूर

**विशाखा**
९, प्रतापनगर, ग्लास फॅक्टरी जवळ, टोंक रोड,
जयपूर, राजस्थान-३०२ ०१८.
दूरध्वनी क्र. ०१४१ २७०३७२५

**विविधा**
वुमेन रिसोर्स अँड डॉक्युमेंटेशन सेंटर ३३५,
महावीर नगर, महाराणी फार्म,
दुर्गापूर, जयपूर-३०२ ०१८.
दूरध्वनी क्र. ०१४१-२७६२९३२/०९३१४५०३७८५/०९८२९०६८७४४
vividha_2001@yahoo.com

**विविधा**
महिला सलाह एवं सुरक्षा केंद्र (नॉर्थ),
महिला थाना (नॉर्थ, धबाई जी की हवेली)
हवा महल रोड, जयपूर
दूरध्वनी क्र. ०१४१ ५१७२००८

## उत्तर प्रदेश - लखनौ

**सहयोग**
ए-२४०, फैझाबाद रोड, इंदिरा नगर,
लखनौ-२२६ ०१६, उत्तर प्रदेश
दूरध्वनी क्र. +९१-५२२ २३४१३१९/२३१०७४७/२३१०८६०
kritire@sahayogindia.org

**हमसफर**
"सपोर्ट सेंटर फॉर विमेन"
२७, न्यू बेरी रोड (टाईम्स ऑफ इंडिया जवळ)
लखनौ २२६००१. उत्तर प्रदेश
दूरध्वनी क्र. ०५२२ २२०५२१५

## नॉर्थ मेघालय

**व्होलंटरी हेल्थ असोसिएशन**
इडन ब्लेस स्कूल जवळ, उमकदैत नोंग्मेंसोंग, शिलाँग-७३९ ०२१.
दूरध्वनी क्र. ०३६४-२५२२८३४/२५२२८३५
(ऑफिस) २५२०४५३
bj1975@rediffmail.com, vhamegh@rediffmail.com

**लीम्मुंग की सेंग किंथे**
दूरध्वनी क्र. ०३६४-२५०४२३३/२२२०५९५

## मध्य प्रदेश - भोपाल

**संगिनी - जेन्डर रिसोर्स सेंटर**
जी-३/३८५, गुलमोहर कॉलनी,
भोपाल-४६२ ०३९.
दूरध्वनी क्र. ०७५५-४२७६१५८
janginicenter@rediffmail.com